


दैनिक
# आरंभपर्व
आरंभ एका नव्या पर्वाचा
Epaper : www.aparv.com

• वर्ष : ०३ • अंक : १८० • पुणे • गुरुवार, दि. १९ मार्च २०२६ • मराठी दैनिक •पाने ४ •किंमत : २ रूपये •RNI No.-MAHMAR/2023/89313

## ठळक बातम्या

### इमारतीचा भाग कोसळला

**पुणे (आरंभ पर्व) : सदाशिव पेठेतील चारूदत्त अपार्टमेंट येथे मध्यरात्री सीमा भिंत, गॅलरी आणि जिन्याचा काही भाग कोसळ्याने तीन मजली इमारतीत अडकलेल्या १० रहिवाशांची अग्निशामक दलाने सुखरूप सुटका केली. सुर्देवाने या घटनेत कोणतीही जीवितहानी किंवा जखमी झाले नाही. मंगळवारी मध्यरात्री सव्वा बारा वाजण्याच्या सुमारास सदाशिव पेठ येथील चारूदत्त अपार्टमेंटमध्ये इमारतीचा काही भाग कोसळून नागरिक अडकल्याची माहिती अग्निशामक दलाला मिळाली. तत्काळ मध्यवर्ती केंद्रातून अग्निशामक पथक वाहन तसेच जनता फायर ब्रिगेडचे वाहन घटनास्थळी रवाना करण्यात आली. घटनास्थळी जवानांनी परिस्थितीचा आढावा घेत पोहोचताच बचावकार्य सुरू केले. पहिला, दुसरा आणि तिसरा मजल्यावर पाच आणि पाच पुरूष अशा १० जणांना तसेच एका श्वानाला एक्स्टेंशन लेंडर, सेफ्टी बेल्ट आणि दोरांच्या सहाय्याने सुरक्षितपणे खाली उतरविण्यात आले. सुमारे एका तासाच्या अथक प्रयत्नानंतर सर्वांना सुरक्षित बाहेर काढण्यात यश आले.**

### मद्याच्या दुकानामुळे वाहतूक कोंडी

**बंडगार्डन (आरंभ पर्व) : मंगळवार पेठ येथील वाईन शॉप बंद करावा किंवा स्थलांतरित करावा या मागणीसाठी नगरसेविका कल्पना दिलीप बहिरट यांनी केली आहे. या प्रकरणी मागणीचे निवेदन जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी यांच्याकडे दिले आहे. या भागातील मद्याच्या दुकानामुळे येथे प्रचंड वाहतूक कोंडी होते तसेच ज्येष्ठ नागरिक आणि महिलांना ये-जा करताना नाहक त्रास होत असल्याचे निवेदनात म्हटले आहे. तसेच गुन्हेगारी वाढल्यामुळे सुरक्षेचा प्रश्न होऊन कायदा व सुव्यवस्था धोक्यात आली आहे. हे दुकान कायमस्वरूपी बंद करावा अथवा दुसरीकडे स्थलांतरित करावे असे निवेदन दिले आहे. मद्याचे दुकान बंद करण्यासाठी १३ मार्च रोजी समर्थ पोलिस ठाण्यासमोर नगरसेविका कल्पना बहिरट यांनी धरणे आंदोलन केले होते. परंतू पोलिसांनी याची दखल घेतली नसल्याने जिल्हाधिकारी यांच्याकडे मागणी करण्यात आली आहे. यावेळी कार्यकर्त्यांनी या दरम्यान स्थानिक नागरिक महिला, पुरुष, मोठ्या संख्येने उपस्थित होते.**

# दूषित अन् अपुरा पाणीपुरवठा

**नागरिकांच्या जीवाशी खेळ, नगरसेवकांनी प्रशासनाला धरले धारेवर, पाणीपुरवठ्याबाबत क्षेत्रीय कार्यालयनिहाय बैठका घेण्याचे महापौरांचे आदेश**

- ६० ते ७० ठिकाणी ड्रेनेज व पाण्याची लाइन एकत्रच

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

पुणे शहर आणि उपनगरांमध्ये सध्या अपुरा तसेच कमी दाबाने पाणीपुरवठा होत असल्याची तक्रार समोर येत आहे. अनेक भागांत प्रतिव्यक्ती दहा लिटरही पाणी मिळत नसल्याची स्थिती आहे. याशिवाय पिण्याच्या पाण्यात सांडपाण्याची मिसळ होत असल्याच्या तक्रारी वाढल्या असून दूषित पाण्यामुळे नागरिकांना उलटी, जुलाब आणि अतिसाराचा त्रास सहन करावा लागत आहे. या पार्श्वभूमीवर नगरसेवकांनी अशुद्ध व कमी दाबाच्या पाणीपुरवठ्यावरून महापालिका प्रशासनाला चांगलेच जाब विचारला. परिस्थितीची गांभीर्याने दखल घेत महापौर मंजुषा नागपुरे यांनी क्षेत्रीय कार्यालयनिहाय पाणीपुरवठ्याचा आढावा घेण्यासाठी नगरसेवक आणि संबंधित अधिकाऱ्यांची तातडीची बैठक घेण्याचे निर्देश दिले. महापालिकेच्या सर्वसाधारण




सभेला सुरवात झाल्यानंतर राष्ट्रवादीच्या (अजित पवार) नगरसेविका प्रिया गदादे यांनी जनता वसाहतमधील ड्रेनेज आणि पाणीपुरवठ्याबाबत मुद्दा उपस्थित केला. कोंढवा, महंमदवाडीसह समाविष्ट गावांमध्ये पाणीपुरवठा अपुरा होत आहे. किमान अर्धा ते एक तास पाणी मिळणे अपेक्षित आहे; परंतु प्रतिव्यक्ती १० लिटर देखील पाणी मिळत नाही. त्यामुळे टँकरवर अवलंबून राहावे लागत आहे. काँग्रेसचे प्रशांत जगताप, राष्ट्रवादीचे हाजी गफूर पठाण, वैशाली बनकर, सूरज लोखंडे, अश्विनी लांडगे, भाजपचे हरिदास चरवड, प्राची आल्हाट, दिलीप वेडे पाटील, ॲड. प्रसन्न जगताप यांचा समावेश होता. कोंढवा भागाला पाणीपुरवठा करणाऱ्या मुख्य जलवाहिनीची दुरुस्ती मंगळवारी पूर्ण करण्यात आली आहे. उपनगरातील विविध भागांत आतापर्यंत १४ पाण्याच्या टाक्यांची

## मुख्यमंत्र्यांनी तोडगा काढवा : खा. सुप्रिया सुळे




**खासदार सुप्रिया सुळे यांनी काल पुणे महानगरपालिकेत भेट दिली, पुणे शहराच्या पाण्यावरून आणि पाणी बिलाच्या थकबाकीवरून महापालिका आणि जलसंपदा विभाग यांच्यामध्ये सुरू झालेल्या वादावर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी लक्ष घालून तोडगा काढवा, असे मत राष्ट्रवादी (शरद पवार) पक्षाच्या नेत्या खासदार सुप्रिया सुळे यांनी व्यक्त केले आहे. शासनाच्या दोन विभागांमध्ये अशा प्रकारे वाद निर्माण होणे योग्य नाही, त्यामुळे याबाबत आपण मुख्यमंत्र्यांना पत्र लिहिणार असल्याचेही त्यांनी नमूद केले.**

कामे पूर्ण झाली आहेत. मात्र काही ठिकाणी रस्ते खोदकामास परवानगी किंवा तांत्रिक अडचणी असल्याने जलवाहिनी टाकण्याचे काम अद्याप प्रलंबित आहे. दरम्यान, ड्रेनेज आणि पिण्याच्या पाण्याच्या लाइन एकत्र आल्यामुळे पाणी दूषित होत असल्याच्या तक्रारी वाढल्या आहेत. यानुसार अशा सुमारे ६० ते ७० ठिकाणांची ओळख पटवण्यात आली असून त्या ठिकाणी स्वतंत्र लाइन टाकण्यासाठी लवकरच निविदा प्रक्रिया राबवण्यात येणार आहे. पालिकेत नव्याने समाविष्ट झालेल्या गावांसाठी स्वतंत्र पाणीपुरवठा आराखडा तयार करण्यात आला आहे. तसेच शहराच्या वाढत्या गरजा लक्षात घेता राज्य सरकारकडे पाणीपुरवठ्याचा वाढीव कोटा मंजूर करण्याची मागणी करण्यात आल्याची माहिती पाणीपुरवठा विभागाचे प्रमुख नंदकिशोर जगताप यांनी दिली. बारामती लोकसभा मतदारसंघातील आणि पुणे महापालिकेच्या हद्दीत असलेल्या भागातील विविध नागरी प्रश्नांच्या सोडवणुकीसाठी खा. सुळे यांनी मंगळवारी महापालिका आयुक्तांची भेट घेतली. यावेळी राष्ट्रवादीचे शहराध्यक्ष श्रीकांत पाटील, महापालिकेतील गटनेते काका चव्हाण यांच्यासह पक्षाचे पदाधिकारी व नगरसेवक उपस्थित होते. महापालिका अधिकाऱ्यांच्या बैठकीनंतर माध्यमांशी बोलताना त्यांनी पाण्यावरून निर्माण झालेल्या महापालिका व जलसंपदा विभागातील वादावर मुख्यमंत्र्यांनी लक्ष घालण्याची मागणी केली. सुळे म्हणाल्या, बारामती मतदारसंघात येणाऱ्या शहरातील विविध भागांमध्ये पाणी, कचरा, वाहतूक कोंडी आणि प्रदूषणाची समस्या सातत्याने वाढत आहेत. या समस्या सोडविण्यासाठी दर दोन महिन्यांनी मी महापालिकेकडे पाठपुरावा करते. त्यानुसार आजही महापालिका अधिकाऱ्यांशी हे प्रश्न सोडविण्यासाठी चर्चा केली.

## समान नागरी कायद्यासाठी राज्य सरकारने तीन विभागांकडून अभिप्राय मागवले

**महिनाभरात सरकार भूमिका जाहीर करणार**



**मुंबई (दै. आरंभ पर्व)**

'समान नागरी कायद्या'बाबत राज्य सरकारने मोठे पाऊल उचलले आहे. या कायद्यासंदर्भात विधी व न्याय, सामान्य प्रशासन तसेच महिला व बालकल्याण विभागाकडून अभिप्राय मागवण्यात आले आहेत. येत्या महिनाभरात सर्व संबंधित विभागांची बैठक घेऊन सरकार अधिकृत भूमिका मांडेल, असे उपसभापती नीलम गोऱ्हे यांनी बुधवारी विधान परिषदेत स्पष्ट केले. भाजप आमदार परिणय फुके यांनी विधान परिषदेत याविषयी लक्षवेधी सूचना मांडली होती. "भारतीय संविधानाच्या कलम ४४ नुसार लग्न, घटस्फोट, वारसा हक्क आणि दत्तक विधानासाठी सध्या धर्मांनुसार वेगवेगळे कायदे आहेत. गोव्यात गोवा नागरी संहिता कायदा १८६७ च्या पोर्तुगीज नागरी संहितेवर लागू झाला. १९६१ मध्ये गोवा भारताचा भाग झाला, तेव्हा हा कायदा कायम ठेवला. त्यामुळे गोव्यात सर्वधर्मीयांसाठी हा कायदा लागू आहे. विधान परिषदेत याविषयी लक्षवेधी सूचना मांडली होती. "भारतीय संविधानाच्या कलम ४४ नुसार लग्न, घटस्फोट, वारसा हक्क आणि दत्तक विधानासाठी सध्या धर्मांनुसार वेगवेगळे कायदे आहेत. उत्तराखंड विधानसभेने ७ फेब्रुवारी २०२४ रोजी हे विधेयक मंजूर केले आणि राष्ट्रपतींच्या मंजुरीनंतर २७ जानेवारी २०२५ पासून राज्यात हा कायदा अधिकृतपणे लागू झाला. गुजरातने मार्च २०२६ मध्ये विधानसभेत समान नागरी कायद्याचे विधेयक मांडण्यासाठी समितीने अहवाल सरकारला सादर केला आहे. लवकरच तिथेही हा कायदा लागू होण्याची शक्यता आहे.

## शिवतीर्थावर आज राज ठाकरेंची गर्जना

**उद्धव ठाकरेंसोबतच्या युतीनंतरचा पहिला गुढीपाडवा मेळावा; मोठी घोषणा शक्य**



**मुंबई (दै. आरंभ पर्व)**

मुंबईतील शिवाजी पार्क येथे आज महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचा गुढीपाडवा मेळावा पार पडणार असून, यासाठी जोरदार तयारी करण्यात आली आहे. दरवर्षीप्रमाणे यंदाही राज्यभरातून मनसेचे कार्यकर्ते मोठ्या संख्येने मुंबईत दाखल होणार आहेत. हा मेळावा पक्षासाठी महत्त्वाचा मानला जात असून, यातून पुढील राजकीय दिशा स्पष्ट होण्याची शक्यता आहे. या मेळाव्यात राज

### सभेतून महत्त्वाचे संकेत?

**याआधी झालेल्या पदाधिकारी बैठकीत पक्षाच्या पुढील वाटचालीबाबत सविस्तर चर्चा करण्यात आली होती. त्याचाच पुढचा टप्पा म्हणून हा मेळावा आयोजित करण्यात आला आहे. आगामी काळात पक्ष कोणती भूमिका घेणार, तसेच युतीनंतरची राजकीय समीकरणे कशी असतील, याबाबत महत्त्वाचे संकेत या सभेतून मिळण्याची शक्यता आहे. त्यामुळे संपूर्ण राज्याचे लक्ष आजच्या या मेळाव्याकडे लागले आहे.**


ठाकरे कार्यकर्त्यांना संबोधित करणार आहेत. त्यांच्या भाषणातून पक्षाची आगामी भूमिका, निवडणुकांची रणनीती आणि संघटनात्मक बदल याबाबत मार्गदर्शन केले जाणार आहे. विशेष म्हणजे ठाकरे बंधूंच्या राजकीय युतीनंतर हा पहिलाच गुढीपाडवा मेळावा असल्यामुळे, या युतीबाबत ते नेमके काय बोलणार याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

मेळाव्यासाठी विशेष नियोजन करण्यात आले असून, मैदानात मोठ्या प्रमाणावर व्यवस्था उभारण्यात आली आहे. दोन मोठे स्क्रीन लावण्यात आले आहेत, ज्यावर कार्यक्रमाचे थेट प्रक्षेपण होणार आहे. या स्क्रीनवर कोणते व्हिडिओ दाखवले जाणार याबाबतही उत्सुकता आहे. सायंकाळी सहा वाजता मेळाव्याला सुरुवात होणार असून, त्यानंतर राज ठाकरे यांचे भाषण होईल.

## कॅप्टन अशोक खरातला पोलिस कोठडी : अत्याचारांचा पर्दाफाश

**नाशिक (दै. आरंभ पर्व)**

नाशिकमध्ये तथाकथित अंकशास्त्रज्ञ आणि राजकीय वर्तुळात वावरणारा कॅप्टन अशोक खरात याला गंभीर लैंगिक अत्याचाराच्या आरोपाखाली अटक झाल्याने शहरात मोठी खळबळ उडाली आहे. धार्मिक श्रद्धा, दैवी शक्ती आणि मंत्रतंत्र यांचा आधार घेत महिलांचा विश्वास संपादन करून त्यांच्यावर अत्याचार केल्याचा आरोप त्याच्यावर आहे. गुन्हे शाखेच्या पथकाने बुधवारी पहाटे कारवाई करत त्याला



ताब्यात घेतले असून न्यायालयाने त्याला 23 तारखेपर्यंत पोलिस कोठडी सुनावली आहे. या घटनेमुळे समाजात संतापाचे वातावरण निर्माण झाले आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, 2022 मध्ये एका 35 वर्षीय विवाहित महिलेची कॅनडा कॉर्नर परिसरात अशोक खरातशी ओळख झाली होती. स्वतःकडे दैवी शक्ती असल्याचा दावा करत त्याने मंत्रतंत्र आणि धार्मिक विधींमधून तिचा विश्वास जिंकला. त्यानंतर वेळोवेळी तिला कार्यालयात बोलावून तिच्यावर दबाव टाकण्यात आला. आरोपानुसार, गुंगीकारक पदार्थ देऊन आणि धमक्या देत तिच्यावर वारंवार अत्याचार करण्यात आले. नोव्हेंबर 2022 ते डिसेंबर 2025 या कालावधीत हा प्रकार सुरू असल्याचे समोर आले आहे. या प्रकरणाचा उलगडा पीडित महिलेने तक्रार दाखल केल्यानंतर झाला. तीन वर्षे सहन केल्यानंतर तिने सरकारवाडा पोलिस ठाण्यात धाडसाने तक्रार केली. त्यानंतर पोलिसांनी तातडीने कारवाई करत आरोपीला अटक केली. तपासादरम्यान कॅनडा कॉर्नर येथील त्याच्या कार्यालयाची झडती घेण्यात आली असता एक पेन ड्राइव्ह जप्त करण्यात आला.

# मातृशक्तीच्या हस्ते ६८व्या महाराष्ट्र केसरी कुस्ती स्पर्धेचा भव्य शुभारंभ

**कुस्तीची परंपरा जपत महाराष्ट्राचा झेंडा जगात फडकवा – सुनेत्रा पवार यांचे आवाहन**

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

रामकृष्ण सातव पाटील यांच्या आयोजनातून वाघोली येथे ६८व्या महाराष्ट्र केसरी कुस्ती स्पर्धेचा भव्य शुभारंभ आज मातृशक्तीच्या हस्ते करण्यात आला. उपमुख्यमंत्री मा. श्रीमती सुनेत्रा वहिनी अजित पवार यांच्या हस्ते उद्घाटन पार पडले. यावेळी व्यासपीठावर महाराष्ट्र राज्याच्या नगरविकास व परिवहन राज्यमंत्री मा. श्रीमती माधुरी सतिश मिसाळ, पुण्याच्या महापौर मा. सौ. मंजुषा दीपक नागपुरे यांच्यासह विविध क्षेत्रातील कर्तृत्ववान महिलांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती. उद्घाटन प्रसंगी बोलताना उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार म्हणाल्या, " कुस्तीची मोठी परंपरा महाराष्ट्राला लाभली आहे. या कुस्तीतूनच पाहिले ऑलिम्पिक आपल्या देशाला मिळाले. या महाराष्ट्रात अनेक दिग्गज मल्ल या कुस्तीतून घडले आहेत. कुस्तीची प्रतिष्ठा आपण जपली



पाहिजे. महाराष्ट्राच्या मातीमध्ये घडलेले खेळाडू जागतिक पातळीवर झळकावेत हीच आदरणीय दादांची कायम भूमिका राहिलेली आहे. त्यांच्या या प्रयत्नामुळेच महाराष्ट्राच्या क्रीडा क्षेत्राला नवी दिशा प्राप्त झाली . आदरणीय दादांच्या क्रीडा प्रेमाचा आणि तळमळीचा वारसा आपण सगळ्यांनीच पुढे नेऊयात. वाघोलीच्या स्पर्धेचे आयोजन खरंतर अत्यंत दिमागदार पद्धतीने करण्यात आलं त्यासाठी या स्पर्धेचे आयोजक रामकृष्ण सातव पाटील आणि त्यांच्या सर्वच सहकाऱ्यांचा मी विशेष अभिनंदन करते, त्यांचं कौतुक करते. या स्पर्धेमध्ये विजयी होणाऱ्या यंदाच्या महाराष्ट्र केसरींना आपल्या सर्वांचे लोकप्रिय मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस साहेबांच्या हस्ते रविवारी दिनांक 22 मार्च रोजी बक्षीस वितरण होणार आहे. महाराष्ट्र केसरी स्पर्धेचे उद्घाटन करताना खर तर मी एवढेच आवाहन करते की खेळाडूंनी आखाड्यामध्ये प्रामाणिकपणा दाखवा. आपला खेळ अतिशय चांगल्या प्रकारे सादर करा, आपल्या महाराष्ट्रचे नाव जगामध्ये उज्वल करा. या स्पर्धेत सहभागी झालेल्या सर्व महिलांचं मी मनापासून अभिनंदन करते. स्पर्धेमध्ये सहभागी झालेल्या सर्व मल्लांना त्यांच्या प्रशिक्षकांना मनापासून शुभेच्छा देते". मंजुषा नागपुरे म्हणाल्या , " हा सोहळा महिलांच्या कर्तृत्वाचा उत्सवाचा आहे. महाराष्ट्र केसरीची परंपरा आजही आपण जपतो हीच खरी आदरांजली आहे. खेळाडूंना आपण योग्य to सन्मान म्हणून जिम कीट, त्याची संपूर्ण व्यवस्था आपण उत्तम पद्धतीने केली आहे. कुस्ती जोपासणे ही वाघोलीची

**पंचायत समिती सदस्यांमध्ये मा. सौ. विद्या दत्तात्रय गायकवाड, मा. सौ. सुषमा संतोष मुरकुटे, मा. सौ. कोमल गणेश कांबळे, मा. सौ. मोनिका श्रीकांत कंद, मा. सौ. राणी दत्तात्रय वाळके आणि मा. सौ. शुभांगी राजू खिरीड उपस्थित होत्या. मातृशक्तीचा गौरव या संकल्पनेवर आधारित हा उद्घाटन सोहळा वाघोलीतील नागरिकांसाठी अविस्मरणीय ठरला. १८ ते २२ मार्चदरम्यान ही स्पर्धा रंगणार असून राज्यभरातील कुस्तीप्रेमींचे लक्ष या स्पर्धेकडे लागले आहे.**

परंपरा आहे. जागतिक स्तरावर कुस्तीला ग्लामर मिळणे आज गरजेचे आहे. महाराष्ट्र केसरी ठरलेले स्पर्धक पुन्हा यंदाच्या स्पर्धेत भाग घेत असल्याने यंदाची महाराष्ट्र कुस्ती स्पर्धा रंजक ठरणार आहे". रामकृष्ण सातव पाटील म्हणाले,"नेहमी कुस्ती स्पर्धेला महिला भगिनींची संख्या कमी असते मात्र या वर्षी महिलांची संख्या खूप वाढली आहे. कुस्ती कडे पाहण्याचा दृष्टिकोन बदला पाहिजे ही संकल्पना होती त्यातूनच आज 4000 हजार महिलांचा सहभाग आज इथे झाला आहे . प्रथमताच कुस्ती स्पर्धेत महिलांचा गौरव होतं आहे.यंदाची स्पर्धा गावातील दानशूर व्यक्तीमुळे ही एवढी भव्य दिव्य होतं आहे". या स्पर्धेची सुरुवात स्व. कुस्ती महर्षी मामासाहेब मोहोळ यांनी केली होती. त्यांच्या कार्याचा वारसा पुढे नेत रामकृष्ण सातव पाटील यांच्या नेतृत्वाखाली यंदाची ६८वी स्पर्धा भव्य आणि दिव्य स्वरूपात आयोजित करण्यात आली आहे. या क्रीडानगरीला "स्व. अजितदादा पवार क्रीडानगरी" असे नाव देऊन त्यांना अभिवादन करण्यात आले. यंदाच्या स्पर्धेत विजेत्यांसाठी आकर्षक बक्षिसांची घोषणा करण्यात आली असून महाराष्ट्र केसरी विजेत्याला फॉर्च्युनर गाडी, उपविजेत्याला स्कॉर्पिओ N, तसेच विविध गटांतील सुवर्णपदक विजेत्यांना १८ बुलेट आणि रौप्य पदक विजेत्यांना स्प्लेंडर गाड्या देण्यात येणार आहेत. या बक्षिसांसाठी वाघोली ग्रामस्थ व हवेली तालुक्यातील दानशूर व्यक्तींनी योगदान दिले आहे. स्पर्धेदरम्यान तरुणांसाठी फोटोग्राफी, रॅप यांसारख्या विविध स्पर्धांचे आयोजनही करण्यात आले आहे.

यावेळी प्रमुख उपस्थितीत मा. सौ. मोनिका मुरलीधर मोहोळ, शिरूर हवेली आमदार माऊली कटके, मा. सौ. संजीला बापुसाहेब पठारे, मा. श्रीमती मालतीताई बाबुराव पाचर्णे, मा. सौ. सुजाता अशोक पवार, मा. सौ. मनीषा ज्ञानेश्वर कटके, मा. सौ. पूजा प्रदीप कंद उपस्थित होत्या. कार्यक्रमाचे निमंत्रक म्हणून सन्माननीय पुणे मनपा नगरसेविका मा. सौ. श्रेयस प्रितम खांदवे, मा. सौ. ऐश्वर्या सुरेंद्र पठारे, मा. सौ. रत्नमाला संदीप सातव, मा. सौ. तृप्ती संतोष भरणे यांनी आयोजनाची धुरा सांभाळली. तसेच सन्माननीय जिल्हा परिषद सदस्या मा. सौ. सुरेखा रमेश हरगुडे, मा. सौ. कोमल संदेश आव्हाळे, मा. सौ. शितल सुजित कांबळे, मा. सौ. रुपाली रमेश कोंडे यांची उपस्थिती होती.

## थोडक्यात पण महत्वाचे



### फॅबइंडियाने केली कलेक्शनची घोषणा

पुणे (आरंभ पर्व) : महाराष्ट्रातील नववर्षाचा उत्साहपूर्ण सण गुढी पाडवा जवळ येत असताना, फॅबइंडियाने आपल्या खास गुढी पाडवा कलेक्शनची घोषणा केली आहे. परंपरेत गुंफलेली समृद्धी आणि उत्साह साजरा करण्यासाठी तयार केलेल्या या कलेक्शनमध्ये पुरुष आणि महिलांसाठी आकर्षक पोशाखांची खास निवड आहे. पारंपरिक विणकाम आणि आधुनिक शैली यांचा सुंदर संगम या संग्रहात दिसून येतो. महिलांसाठीच्या या कलेक्शनमध्ये आकर्षक हँड-ब्लॉक प्रिंट साड्या, सिल्क एम्ब्रॉइडरी कुर्ते, तसेच बनारसी आणि चिकनकारी दुपट्ट्यांची पारंपरिक देखणी झलक पाहायला मिळते. पुरुषांसाठी या संग्रहात विविध प्रकारचे शर्ट, शॉर्ट आणि लॉन्ग कुर्ते, तसेच उत्कृष्ट कारागिरी दर्शवणारे बंधगला जॅकेट्स उपलब्ध आहेत. फॅबइंडियाचे गुढी पाडवा कलेक्शन आता देशभरातील फॅबइंडिया स्टोअर्समध्ये तसेच ऑनलाइन www.fabindia.com वर उपलब्ध आहे.



### पद्मिनी अभिमान गाटे यांचे दुखद निधन

बार्शी (आरंभ पर्व) : अल्पशा आजाराने सारोळे येथील गृहिणीचे निधन; गाटे परिवारावर दुःखाचा डोंगर बार्शी तालुक्यातील सारोळे येथील सौ. पद्मिनी अभिमान गाटे (वय ५२) यांचे अल्पशा आजाराने दुःखद निधन झाले. त्यांच्या निधनाची वार्ता समजताच परिसरात हळहळ व्यक्त करण्यात येत आहे. अत्यंत संघर्षमय परिस्थितीत त्यांनी आपल्या कुटुंबाला आधार देत कुटुंब उभे करण्यासाठी मोठे योगदान दिले होते. त्यांच्या जाण्याने गाटे परिवारावर दुःखाचा डोंगर कोसळला असून नातेवाईक व ग्रामस्थांकडून शोक व्यक्त केला जात आहे. त्या सारोळे विविध कार्यकारी सेवा सोसायटीचे संचालक श्री. अभिमान गाटे यांच्या पत्नी होत्या. त्यांच्या पश्चात पती, दोन मुले, दोन सुना व नातवंडे असा मोठा परिवार आहे. त्यांच्यावर सारोळे (ता. बार्शी) येथे अंत्यसंस्कार करण्यात आले.

### ट्रेडमार्क उल्लंघनकर्त्यांविरोधात न्यायालयाचा मनाई हुकूम



पुणे (आरंभ पर्व) : जेएसडब्ल्यू स्टील कोटेड प्रॉडक्ट्स लिमिटेडने आपल्या नोंदणीकृत ट्रेडमार्कचा अनधिकृत वापर करणाऱ्या कंपन्यांविरुद्ध मुंबई उच्च न्यायालयाकडून अंतरिम मनाई हुकूम मिळवण्यात यश मिळवले आहे. या प्रकरणात न्यायालयाने संबंधितांवर कडक कारवाईचे आदेश दिले आहेत. नाशिक जिल्ह्यातील लासलगाव आणि मनमाड परिसरातील काही व्यापाऱ्यांकडून 'कलरऑन+' आणि 'विश्वास+' या ब्रँडशी साधर्म्य असलेली चिन्हे वापरली जात असल्याचे निदर्शनास आले होते. या पार्श्वभूमीवर न्यायालयाने कोर्ट रिसीव्हर नियुक्त करून उल्लंघन करणारा माल जप्त करण्याचे निर्देश दिले. यानुसार २८ फेब्रुवारी आणि १ मार्च २०२६ रोजी पार्वती स्टील ट्रेडर्स, चामुंडा स्टील आणि आकाश स्टील पॉईंट येथे छापेमारी करण्यात आली. या कारवाईत मोठ्या प्रमाणावर बनावट व उल्लंघन करणारा माल जप्त करून सील करण्यात आला. यापूर्वीही जेएसडब्ल्यूने संबंधित प्रकरणात पोलिसांकडे तक्रारी दाखल केल्या होत्या. कंपनीने स्पष्ट केले की, आपल्या ट्रेडमार्क व बौद्धिक संपदेचे संरक्षण करण्यासाठी अशा उल्लंघनांविरुद्ध कठोर कारवाई सुरूच राहील. कंपनीच्या या यशस्वी कारवाईमुळे बाजारातील बनावट उत्पादनांवर आळा बसण्यास मदत होणार असल्याचे मानले जात आहे.

### वीवो Y51 प्रो 5G लॉन्च




पुणे (आरंभ पर्व) : वीवो इंडियाने आपल्या Y सिरीजमध्ये नवीन स्मार्टफोन वीवो Y51 प्रो 5G लॉन्च केला आहे. हा स्मार्टफोन अशा युजर्ससाठी डिझाइन करण्यात आला आहे जे स्मूथ आणि विश्वासार्ह परफॉर्मन्ससोबत इमर्सिव्ह एंटरटेनमेंटचा अनुभव घेऊ इच्छितात. हा फोन दैनंदिन वेगवान आणि बदलत्या जीवनशैलीशी जुळवून घेणारा अनुभव देतो. दीर्घकाळ टिकणारी परफॉर्मन्स, स्मूथ मल्टीटास्किंग आणि रोजच्या वापरासाठी सोयीस्कर अनुभव यावर विशेष लक्ष देत हा डिव्हाइस तयार करण्यात आला आहे. यामध्ये वीवोची अशी कल्पना दिसून येते की, प्रोडक्टिव्हिटी आणि एंटरटेनमेंट दोन्हींसाठी उपयोगी ठरणारे प्रॅक्टिकल इनोव्हेशन वापरकर्त्यांना देणे. वीवो Y51 प्रो 5G मध्ये 7200 mAh ची मोठी बॅटरी देण्यात आली असून हा स्मार्टफोन मीडियाटेक डायमेन्सिटी 7360 टर्बो चिपसेटवर चालतो. यामध्ये IP68 आणि IP69 रेटिंग देण्यात आली आहे.

# समाविष्ट गावांतील कर आकारणीवर महापौरांची विशेष बैठक

## सभासदांची समिती स्थापन करण्याचा निर्णय : नगरसेवक सुभाष नाणेकर यांनी केली होती बैठकीची मागणी



**पुणे (दै. आरंभ पर्व)**

पुणे महानगरपालिका हद्दीत नव्याने समाविष्ट झालेल्या गावांमधील कर आकारणीबाबत नागरिकांकडून येत असलेल्या तक्रारींच्या पार्श्वभूमीवर महापौर मंजुषा नागपुरे यांच्या अध्यक्षतेखाली विशेष बैठक घेण्यात आली.

नगरसेवक सुभाष नाणेकर यांनी या बैठकीसाठी महापौर मंजुषा नागपुरे यांच्याकडे मागणी केली होती.

ही बैठक सोमवारी (१६ मार्च) दुपारी शिवाजीनगर येथील परिमंडळ क्र. २ कार्यालयात पार पडली.

बैठकीला गटनेते काकासाहेब चव्हाण, सुभाष नाणेकर, अनिता इंगळे, धनश्री कोल्हे, तसेच समाविष्ट गावांतील इतर लोकप्रतिनिधी उपस्थित होते. प्रशासनाकडून अतिरिक्त महापालिका आयुक्त पृथ्वीराज बी.पी. आणि उपआयुक्त (कर आकारणी) रवी पवार उपस्थित होते. याशिवाय समाविष्ट गावांतील नागरिक आणि प्रतिनिधी मोठ्या संख्येने उपस्थित होते.


बैठकीच्या सुरुवातीला मिळकतकर विभागाने समाविष्ट गावांमधील कर आकारणीसंदर्भात सविस्तर सादरीकरण केले. त्यानंतर लोकप्रतिनिधी आणि नागरिकांनी विविध मुद्दे उपस्थित करत निवासी व बिगरनिवासी मिळकतींवर जास्त कर आकारणी होत असल्याची तक्रार मांडली. शेजारील गावांचा ए.आर.व्ही. विचारात न घेता कर आकारणी करण्यात आल्याचे तसेच ग्रामपंचायत पद्धतीप्रमाणे कर आकारणी करावी, अशी मागणीही करण्यात आली.

नागरिकांनी पायाभूत सुविधा पूर्णपणे उपलब्ध नसताना महानगरपालिकेच्या प्रमाणे कर आकारणी करणे योग्य नसल्याचे मत व्यक्त केले. तसेच दंड, शास्ती आणि व्याजावर व्याज आकारणीबाबतही आक्षेप नोंदविण्यात आला. नांदेड सिटी परिसरातील मिळकतींना स्वतंत्र सुविधा असतानाही कोणतीही विशेष कर सवलत देण्यात आलेली नसल्याचा मुद्दाही यावेळी उपस्थित करण्यात आला. यावर अतिरिक्त महापालिका आयुक्त पृथ्वीराज बी.पी. यांनी कर आकारणी ही धोरणात्मक बाब असून महानगरपालिकेच्या मुख्य सभेने मंजूर केलेल्या ठरावांनुसारच ती करण्यात येत असल्याचे स्पष्ट केले. या धोरणामध्ये बदल करण्यासाठी मुख्य सभेचा नवीन ठराव आवश्यक असल्याचे त्यांनी सांगितले.

बैठकीच्या अध्यक्षस्थानावरून बोलताना महापौर मंजुषा नागपुरे यांनी समाविष्ट गावांतील कर आकारणीच्या प्रश्नावर संबंधित सभासदांची एक समिती स्थापन करण्याचा निर्णय जाहीर केला. या समितीकडे सर्व संबंधितांनी आपली लेखी मते व सूचना सादर कराव्यात, त्यानंतर प्रशासनाशी चर्चा करून योग्य तो मार्ग काढण्यात येईल, असे त्यांनी सांगितले.

आवश्यक असल्यास राज्य शासनाचे मार्गदर्शनही घेतले जाईल, असेही त्यांनी नमूद केले. तसेच सन २०२६ च्या महापालिका अंदाजपत्रकात समाविष्ट गावांतील पायाभूत सुविधांसाठी अधिक तरतूद करण्याबाबत लेखी सूचना देण्याचे आवाहनही महापौरांनी केले.

# डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंतीनिमित्त संयुक्त बैठक



**पुणे (दै. आरंभ पर्व)**

पुणे महानगरपालिकेतर्फे दरवर्षी १४ एप्रिल रोजी भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती उत्साहात साजरी केली जाते. यंदाच्या जयंती उत्सवाच्या पार्श्वभूमीवर जयंती मंडळांचे पदाधिकारी, पोलीस प्रशासन आणि महानगरपालिकेच्या अधिकाऱ्यांची संयुक्त बैठक सोमवारी (दि. १६ मार्च २०२६) महानगरपालिकेच्या मुख्य इमारतीतील छत्रपती शिवाजी महाराज सभागृहात आयोजित करण्यात आली.

या बैठकीस महापौर मंजुषा नागपुरे, उपमहापौर परशुराम वाडेकर, महापालिका आयुक्त नवल किशोर राम, अतिरिक्त महापालिका आयुक्त ओमप्रकाश दिवटे, नगरसेविका अनिता इंगळे, अर्चना जगताप, सपना छाजेड, नगरसेवक निलेश आल्हाट, रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (आ) च्या पक्षनेत्या हिमाली कांबळे यांसह संबंधित अधिकारी उपस्थित होते.

बैठकीत १४ एप्रिल रोजी होणाऱ्या जयंती कार्यक्रमाच्या पार्श्वभूमीवर विविध व्यवस्थांबाबत सविस्तर चर्चा करण्यात आली. जयंती मंडळांच्या सूचनांच्या अनुषंगाने डॉ. बाबासाहेब आंबेडकर उद्यान परिसरात सावली मंडप उभारणे, पिण्याच्या पाण्यासाठी टँकर उपलब्ध करणे, स्वच्छता आणि वाहतूक व्यवस्थेचे नियोजन करणे, मोबाईल व पोर्टेबल शौचालयांची व्यवस्था करणे तसेच पुरेशी प्रकाशयोजना व ध्वनी व्यवस्था ठेवण्याचे निर्देश देण्यात आले. उद्यान परिसरात १० ते १६ एप्रिलदरम्यान स्वच्छता राखण्यासाठी स्वतंत्र पथके तीन शिफ्टमध्ये नियुक्त करण्याचे, अतिक्रमणांवर कारवाई करण्याचे तसेच पुतळ्याची नियमित स्वच्छता राखण्याचे आदेश देण्यात आले. उष्माघाताची शक्यता लक्षात घेऊन फिरता दवाखाना, दोन रुग्णवाहिका, डॉक्टर व सहाय्यक कर्मचारी नियुक्त करण्याचेही निर्देश देण्यात आले. याशिवाय उद्यान परिसरात सुरक्षा व्यवस्था वाढवणे, नागरिकांच्या वाहनांसाठी पार्किंगची सोय करणे, रस्त्यांवरील खड्डे बुजविणे, फुटपाथ दुरुस्त करणे आणि परिसरातील राडारोडा हटविण्याचे आदेश देण्यात आले. तसेच अग्निशामक दलाची गाडी आवश्यक उपकरणांसह तैनात ठेवण्याचे निर्देश देण्यात आले. महापौर मंजुषा नागपुरे यांनी सर्व संबंधित विभागांनी दिलेल्या सूचनांनुसार तयारी पूर्ण करून नागरिकांना कोणताही त्रास होणार नाही याची काळजी घ्यावी, असे निर्देश दिले. तसेच शहरातील सर्व वॉर्ड कार्यालयांनी आपल्या हद्दीतील डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यांजवळ स्वच्छता आणि आवश्यक व्यवस्था ठेवण्याचे आदेश देण्यात आले.

# मुंबईत एनएआर-इंडियाचे अधिवेशन

## ₹३००० कोटींच्या व्यवहारांची अपेक्षा

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

देशातील रिअल इस्टेट क्षेत्रातील प्रमुख संस्था एनएआर-इंडिया यंदा मुंबईत वार्षिक राष्ट्रीय अधिवेशन आयोजित करत असून, या कार्यक्रमातून सुमारे ₹3000 कोटींच्या व्यावसायिक व्यवहारांची अपेक्षा व्यक्त करण्यात आली आहे. या अधिवेशनात रिलायन्स, टाटा, बिर्ला समूहांसह देशातील अग्रगण्य रिटेल ब्रँड्सचा सहभाग राहणार आहे.

देशभरातून १,८०० हून अधिक रिअल्टर्स, डेव्हलपर्स, गुंतवणूकदार, मालमत्ता मालक आणि वित्तीय संस्थांचे प्रतिनिधी या कार्यक्रमात सहभागी होणार आहेत.

निवासी, व्यावसायिक आणि रिटेल क्षेत्रात नेटवर्किंग, भागीदारी आणि व्यवहारांना चालना देणे हा या अधिवेशनाचा प्रमुख उद्देश आहे. या कार्यक्रमात अभिनेते बोमन इराणी, आध्यात्मिक वक्त्या जया किशोरी यांच्यासह डॉ. निरंजन हिरानंदानी, हाफिज कॉन्ट्रैक्टर, सवीजी ढोलकिया यांसारखे मान्यवर उपस्थित राहणार आहेत. एनएआर-इंडियाचे प्रतिनिधी सुमंत रेड्डी यांनी सांगितले की, या अधिवेशनातून रिअल इस्टेट क्षेत्रातील सहकार्य वाढून नवीन व्यावसायिक संधी निर्माण होतील.

तसेच चंद्रेश विठलानी यांनी संघटित रिअल्टर्सच्या भूमिकेमुळे पारदर्शक व्यवहारांना गती मिळेल, असे नमूद केले. एरिया ग्रुपतर्फे आयोजित या अधिवेशनात विविध चर्चासत्रे, नेटवर्किंग सत्रे आणि व्यवसाय जुळवणी उपक्रम होणार असून, भारतीय रिअल इस्टेट क्षेत्राच्या विकासाला नवी चालना मिळेल, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

# इसुझू मोटर्सकडून देशभर 'प्री-समर कॅम्प'

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

इसुझू मोटर्स इंडियाने आपल्या ग्राहकांसाठी देशव्यापी 'इसुझू आय-केअर प्री-समर कॅम्प' आयोजित करण्याची घोषणा केली आहे. हा विशेष सेवा उपक्रम 23 ते 28 मार्च 2026 दरम्यान देशभरातील सर्व अधिकृत सेवा केंद्रांवर राबविण्यात येणार आहे. या उपक्रमाचा उद्देश ग्राहकांना उन्हाळ्यापूर्वी वाहनांची योग्य तपासणी करून त्रासमुक्त ड्रायव्हिंग अनुभव देणे हा आहे. इसुझू डी-मॅक्स पिक-अप आणि एसयूव्ही वाहनांसाठी हा कॅम्प उपयुक्त ठरणार आहे. शिबिरादरम्यान ग्राहकांना अनेक आकर्षक सुविधा दिल्या जाणार आहेत. यामध्ये मोफत 37-बिंदू तपासणी, मजुरीवर 10 टक्के सवलत, सुट्ट्या भागांवर व वंगणावर 5 टक्के सवलत, तसेच विस्तारित वॉरंटीवर 20 टक्क्यांपर्यंत सवलतींचा समावेश आहे. याशिवाय रोडसाइड असिस्टन्स आणि इतर सेवांवरही विशेष ऑफर उपलब्ध असतील. हा प्री-समर कॅम्प पुणे, मुंबई, नागपूर, नाशिकसह देशातील अनेक शहरांमध्ये आयोजित करण्यात येणार असून ग्राहकांना आपल्या जवळच्या अधिकृत सेवा केंद्रात जाऊन या सुविधांचा लाभ घेता येणार आहे.




- **२३ ते २८ मार्चदरम्यान सेवा लाभ**

# कॅसाग्रँडची घर खरेदीदारांसाठी नो प्री-ईएमआय योजना सुरू

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

भारतातील आघाडीच्या रिअल इस्टेट डेव्हलपर्सपैकी एक असलेल्या कॅसाग्रँडने पुण्यातील अप्पर खराडी जवळ असलेल्या आपल्या कॅसाग्रँड कॅलॅडियम या प्रीमियम रेसिडेन्शियल प्रोजेक्टमध्ये 'नो प्री-ईएमआय' योजना सुरू केली आहे. ही योजना मर्यादित कालावधीसाठी असून फक्त नवीन बुकिंगसाठी लागू आहे.

ग्राहकांसाठी ही ऑफर 31 मार्च 2026 पर्यंत उपलब्ध राहणार आहे. या योजनेचा उद्देश घर खरेदी प्रक्रिया अधिक सोपी आणि परवडणारी बनवणे हा आहे, ज्यामुळे इच्छुकांना सहजपणे स्वतःचे घर घेता येईल. आजच्या काळात अनेक लोकांना घरभाडे, ईएमआय आणि इतर खर्च एकाच वेळी सांभाळावे लागतात. अशा परिस्थितीत ही योजना घर खरेदी प्रक्रिया सुलभ करण्यासाठी कॅसाग्रँडचा एक प्रयत्न आहे. या योजनेअंतर्गत, ठराविक कालावधीपर्यंत कॅसाग्रँड खरेदीदाराच्या वतीने प्री-ईएमआय स्वतः भरते. त्यामुळे घर बांधकाम सुरू असताना ग्राहकांना लगेच मासिक हप्त्यांचा ताण येत नाही आणि ते सहजपणे आपले घर खरेदी करू शकतात. मर्यादित कालावधीसाठी असलेली ही ऑफर घर खरेदी प्रक्रिया सोपी, स्पष्ट आणि सोयीची व्हावी यासाठी तयार करण्यात आली आहे. ग्राहकांना या योजनेचा लाभ घेण्यासाठी फक्त प्रॉपर्टी बुक करावी लागेल आणि ठरलेल्या वेळेत होम लोनची प्रक्रिया पूर्ण करावी लागेल. कॅसाग्रँड कॅलॅडियममध्ये आकर्षक डिझाइन असलेली प्रशस्त 2 आणि 3 बीएचके घरे उपलब्ध आहेत.



येथे 110 पेक्षा जास्त आधुनिक सुविधा आहेत, जसे की 1800 चौ.फुट इन्फिनिटी पूल, अँफीथिएटर, योगा कोर्ट आणि मल्टी-पर्पज कोर्ट आणि इतर अनेक सुविधांचा समावेश आहे. या प्रोजेक्टमध्ये सुमारे 70% मोकळी जागा असून त्याची रचना सिंगापूर स्टाइलमध्ये करण्यात आली आहे.

हा प्रोजेक्ट पुण्यातील अप्पर खराडी या वेगाने विकसित होणाऱ्या भागात आहे.

येथे नामांकित शाळा, कॉलेज, आयटी हब्स आणि इतर आवश्यक सुविधा सहजपणे उपलब्ध आहेत. हा प्रोजेक्ट महाराष्ट्र रेरा – नोंदणी क्र.: P52100080302 अंतर्गत नोंदणीकृत आहे. या योजनेचा लाभ घेण्यासाठी साइटला भेट द्या किंवा 8220049082 वर कॉल करा.

# डब्ल्यूफॉरविमेन पॅरिस फॅशन वीकमध्ये पदार्पण करणारा पहिला इंडियन वेअर रिटेल ब्रँड

## गेल्या वर्षी न्यूयॉर्कमध्ये ऐतिहासिक पदार्पणानंतर डब्ल्यूच्या पॅरिसमधील प्रदर्शनामधून जगातील सर्वात प्रतिष्ठित रनवेवर समकालीन भारतीय पोशाखांचे वाढते वर्चस्व दिसून येते.

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

भारतीय फॅशनसाठी महत्त्वपूर्ण क्षणामध्ये आदित्य बिर्ला फॅशन अँड रिटेल लि.च्या अधिपत्याखालील डब्ल्यूफॉरविमेन पॅरिस फॅशन वीकमध्ये त्यांच्या स्प्रिंग-समर26 कलेक्शनला सादर करणारा पहिला भारतीय वेअर बँड ठरला आहे, जेथे समकालीन भारतीय फॅशनला जगातील सर्वात प्रभावी प्लॅटफॉर्मवर नेले आहे.



डब्ल्यूचे पॅरिसमधील प्रदर्शन जागतिक स्तरावर महत्त्वाकांक्षी विकासाच्या दिशेने पुढील पाऊल आहे. न्यूयॉर्कपासून पॅरिसपर्यंत ब्रँडच्या रनवे उपस्थिती भारतीय फॅशनच्या दीर्घकाळापर्यंत जागतिक स्तरावरील विस्ताराला दर्शवते, जेथे आधुनिक भारतीय महिलेच्या अद्वितीय फॅशन शैलीची आता जागतिक स्तरावर चर्चा होत आहे.

या ऐतिहासिक क्षणाबाबत मत व्यक्त करत आदित्य बिर्ला फॅशन अँड रिटेल लि.च्या टीसीएनएस डिव्हिजनचे चीफ एक्झिक्युटिव्ह ऑफिसर अनंत डागा म्हणाले, हे रनवे प्रदर्शन आमच्या ब्रँडसाठी, तसेच भारतीय फॅशनसाठी महत्त्वपूर्ण टप्पा आहे. वर्षानुवर्षे आम्ही भारतीय एथनिक वेअरकडे जगाचा पाहण्याचा दृष्टिकोन बदलत आहोत, परंपरा व आधुनिकतेचे संयोजन करत आधुनिक भारतीय महिलांशी संलग्न होणारी फॅशन निर्माण करत आहोत. पॅरिसच्या रनवेवर आमच्या डिझाइन्स सादर होताना पाहणे, हे अत्यंत प्रभावी आणि खास आहे. गेल्या वर्षी न्यूयॉर्कमध्ये आंतरराष्ट्रीय मंचावर पाऊल ठेवल्यानंतर आता आमचे कलेक्शन पॅरिसमध्ये नेणे स्वाभाविक प्रगती आहे. यासह आमचा विश्वास अधिक दृढ झाला आहे की, भारतीय डिझाइन, संस्कृती आणि शैली यांना जागतिक फॅशन विश्वात हक्काचे स्थान आहे. आणि ही तर फक्त सुरुवात आहे. पॅरिस फॅशन वीकमध्ये डब्ल्यूने सण-उत्सव, विशेष प्रसंगांसाठीचे पेहराव आणि समकालीन डिझाइन्सचे विशेष रनवे प्रदर्शन सादर केले. प्रत्येक लूकमधून आजच्या भारतीय स्त्रीची जीवनशैली दिसून आली, ज्यामध्ये स्टायलिश आकर्षकता आणि सहज परिधान करता येण्याजोगी सुलभता यांचे संतुलन होते, जे जागतिक प्रेक्षकांसाठी अतिशय बारकाईने संकल्पित करण्यात आले होते. हे प्रदर्शन फक्त वेशभूषा किंवा उच्च-स्तरीय फॅशनपर्यंत मर्यादित राहिले नाही, तर हाय-स्ट्रीट इंडियन एथनिक वेअरने जागतिक फॅशनच्या सर्वात प्रभावशाली मंचावर आत्मविश्वासाने पाऊल ठेवले आणि आंतरराष्ट्रीय डिझाइनच्या सर्वोच्च स्तरावर आपले स्थान दृढ केले. पारंपारिक कारागिरी आणि समकालीन डिझाइनच्या विनासायास संयोजनासह डब्ल्यूफॉरविमेन सतत सर्जनशीलतेमध्ये येणाऱ्या मर्यादांना दूर करत आहे आणि आधुनिक एथनिक फॅशनमध्ये नवीन निकष स्थापित करत आहे. पॅरिस फॅशन वीकमधील जागतिक पदार्पणानंतर प्रत्येक नवीन कलेक्शन समर गाथेला सांगते, ज्यामध्ये परंपरा आणि उन्हाळ्यामधील परिधान करण्यात अनुकूल पेहरावामधील आधुनिकतेचे संयोजन आहे. सण-उत्सव, सुट्ट्या आणि सोनेरी क्षणांसाठी डिझाइन केलेले हे पोशाख समुद्रकिनाऱ्यावरील सुट्ट्यांपासून शहरात फेरफटका मारण्यापर्यंत सहजपणे शोभून दिसतात. हे कलेक्शन आधुनिक भारतीय शैलीतील उत्साहीपणा, सुलभता आणि अद्वितीय आकर्षकतेला सादर करते. सौम्य पेस्टल रंग, अलौकिक सिल्हूट्स आणि नाजूक नक्षीकाम यांच्या संयोजनातून समर वेडिंग्जचा उत्साहवर्धक भाव टिपण्यात आला आहे. हलकेफुलके कापड आणि गुंतागुंतीची उत्कृष्ट कारागिरी उत्तम पेहरावांची निर्मिती करते, जे वैभवशाली, डौलदार आणि कालातीत वाटतात. आकर्षक द्विरंगी रंगसंगती आणि पृष्ठभागावरील उठावदार तपशील समकालीन भारतीय पेहरावाच्या या शैलीला सादर करतात. हलकी आणि झळाळी असलेली रूपरेषा सूर्यप्रकाशित दिवसातील सोहळ्यांसाठी आणि उन्हाळ्यातील भव्य मेळाव्यांसाठी सुसंस्कृत वॉर्डरोब तयार करते, ज्यामध्ये स्पष्ट जागतिक संवेदनशीलता दिसून येते. आकर्षक प्रिंट्स, उत्साही सिल्हूट्स आणि लक्षवेधक नक्षीकाम उत्सवाचा आनंद द्विगुणित करतात. हवेत लहरणारे केप्स आणि मोहक पोटील्स यांसारखे विचारपूर्वक जोडलेले पैलू उत्सवी पोशाख व साजरीकरणामध्ये समकालीन उत्साहाची भर करतात. आरामदायी सिल्हूट्स, गडद प्रिंट्स आणि ग्राफिक डिझाइन्स भारतीय रिसॉर्ट वेअरला नवीन रूपात सादर करतात. अत्यंत प्रभावी आणि वैविध्यपूर्ण असलेले हे लुक्स उन्हाळ्यातील सहली आणि सुट्ट्यांमधील आनंदाला सादर करतात.




दैनिक
# आरंभपर्व
आरंभ एका नव्या पर्वाचा
Epaper : www.aparv.com
गुरुवार, दि. १९ मार्च २०२६






## थोडक्यात पण महत्वाचे



### डॉ. सदानंद राऊत यांना प्रतिष्ठित आरोग्यसेवा पुरस्कार

नारायणगाव (आरंभ पर्व) : विघ्नहर नर्सिंग होमचे कन्सल्टंट फिजिशियन व संचालक डॉ. सदानंद दगडू राऊत यांना सीताराम जयपूरिया फाउंडेशनतर्फे आयोजित 'मेडिकल अँड हेल्थकेअर एक्सलन्स अवॉर्ड्स'मध्ये सन्मानित करण्यात आले. ग्रामीण आरोग्यसेवेत दिलेल्या उल्लेखनीय योगदानाबद्दल त्यांना 'एक्झेम्प्लर लीडरशिप इन रुरल मेडिसिन अँड हेल्थकेअर' हा पुरस्कार प्रदान करण्यात आला. नवी दिल्ली येथे पार पडलेल्या या कार्यक्रमात देशभरातील नामवंत डॉक्टर आणि तज्ञ उपस्थित होते. दिवंगत सीताराम जयपूरिया यांच्या जन्मशताब्दीनिमित्त आयोजित या उपक्रमातून आरोग्य क्षेत्रातील उत्कृष्ट कार्य करणाऱ्यांचा गौरव करण्यात आला. डॉ. राऊत यांच्या या यशाबद्दल वैद्यकीय क्षेत्रातून त्यांचे कौतुक होत आहे.

### Nykaa Fashion घेऊन आला आकर्षक साड्यांचा खास संग्रह


मुंबई (आरंभ पर्व) : साडीप्रेमींसाठी गुडी पाडवा हा केवळ एक सण नसून परंपरा, रंग आणि शाश्वत कलेचा उत्सव साजरा करण्याची खास संधी आहे. मार्च महिन्यात साजरा होणारा हा सण मराठी नववर्षाची सुरुवात दर्शवतो आणि नव्या आरंभ, समृद्धी व आनंदाचा संदेश देतो. या निमित्ताने कुटुंब आणि मित्रमंडळी एकत्र येऊन उत्सव साजरा करत असताना पारंपरिक पोशाख परिधान करणे हा या सणाचा अविभाज्य भाग ठरतो. या गुडी पाडव्याच्या निमित्ताने Nykaa Fashion साड्यांचा खास निवडक संग्रह सादर करत आहे, ज्यामुळे तुम्ही तुमच्या शैलीनुसार आणि व्यक्तिमत्त्वाला साजेशा रूपात अधिक आकर्षक दिसू शकता. पैठणी आणि कांजीवरमसारख्या पारंपरिक विणकामापासून ते झरीच्या समृद्ध कामाने सजलेल्या रेशमी साड्यांपर्यंत—उत्सवी साड्या आजही नव्या सुरुवातीचे स्वागत करण्यासाठी सर्वाधिक पसंतीचा पर्याय आहेत.



### नवीन उड्डाणपुलासाठी कोमल कुटे यांची नितीन गडकरी यांची भेट

पुणे (आरंभ पर्व) : पुणे परिसरातील वाढत्या वाहतूक कोंडी आणि अपघातांच्या पार्श्वभूमीवर नवीन उड्डाणपुलाच्या मागणीला गती मिळण्याची चिन्हे दिसत आहेत. पुणे शहर महिला मोर्चाच्या उपाध्यक्ष सौ.कोमल सतीश कुटे यांनी केंद्रीय रस्ते वाहतूक व महामार्ग मंत्री नितीन गडकरी यांची त्यांच्या निवासस्थानी सदिच्छा भेट घेतली. या भेटीदरम्यान बोगदा दरी पूल ते नवले पूल ते रावेत या मार्गावरील वाढत्या वाहतूक समस्यांवर सविस्तर चर्चा करण्यात आली. या मार्गावर वारंवार होणारे अपघात लक्षात घेता येथे तातडीने नवीन उड्डाणपूल (एलिव्हेटेड ब्रिज) उभारण्याची मागणी कोमल कुटे यांनी केली. यावेळी संबंधित विभागातील अधिकाऱ्यांशीही संवाद साधण्यात आला. या मागणीची दखल घेत केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी सकारात्मक प्रतिसाद देत विषयावर पुढील कार्यवाही करण्याचे संकेत दिले. स्थानिक नागरिकांच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाच्या असलेल्या या प्रकल्पामुळे वाहतूक कोंडी कमी होऊन अपघातांचे प्रमाण घटण्याची अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

### डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्मारक व पूर्णाकृती पुतळा उभारण्याची मागणी



पुणे (आरंभ पर्व) : भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त पुणे महानगरपालिकेत पूर्वतयारीसाठी विशेष बैठक पुणे महापालिकेत आयोजित करण्यात आली होती, या बैठकीत चांदणी चौक येथे डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्मारक व पूर्णाकृती पुतळा उभारण्याची मागणी रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (आठवले) पक्षाचे युवक राज्य संघटक उमेश कांबळे यांनी केली, तसेच जागा मिळाल्यास पुतळा देण्याची तयारी उमेश कांबळे यांनी दर्शविली. या बैठकीला पुण्याच्या महापौर मंजुषा नागपुरे, उपमहापौर परशुराम वाडेकर, पुणे महानगरपालिका आयुक्त नवल किशोर राम तसेच महानगरपालिकेचे सर्व सन्माननीय नगरसेवक, पोलीस अधिकारी आणि विविध विभागांचे अधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी आंबेडकर चळवळीतील विविध राजकीय पक्षांचे कार्यकर्ते, विविध मंडळांचे अध्यक्ष व सदस्य देखील उपस्थित होते. बैठकीदरम्यान उपस्थितांना आपले मत मांडण्याची संधी देण्यात आली. त्यावेळी पुणे महानगरपालिकेत नव्याने समाविष्ट झालेल्या २३ गावांच्या दृष्टीने शहराचे पश्चिम प्रवेशद्वार मानल्या जाणाऱ्या चांदणी चौक येथे विश्वरत्न महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे भव्य स्मारक आणि पूर्णाकृती पुतळा उभारण्याची मागणी करण्यात आली. यावेळी बोलताना संबंधित उमेश कांबळे यांनी सांगितले की, पुणे महानगरपालिकेने यासाठी योग्य जागा उपलब्ध करून दिल्यास त्यांच्या 'विकास प्रतिष्ठान' संस्थेच्या वतीने डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा पूर्णाकृती पुतळा महानगरपालिकेला देण्याची तयारी आहे.

# जनता हॉस्पिटलमध्ये 'एनसीओ' कॅम्पला उत्स्फूर्त प्रतिसाद

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

पर्वती येथील जनता वसाहतमध्ये असणाऱ्या जनता दवाखान्यामध्ये 'एनसीओ' कॅम्पचे आयोजन करण्यात आले होते. ज्या तपासण्या सर्वसामान्यंना करणे परवडत नाही अशा तपासण्या 'एनसीओ' कॅम्पअंतर्गत करण्यात आल्या. यात प्रामुख्याने थुंकी तपसणी, ब्लड प्रेशर, शुगर, थायरॉईड तसेच कॅन्सरच्या ओरल टेस्ट यांचा समावेश आहे. या तपासण्या सर्वांसाठी मोफत असल्या तरी यामध्ये महिलांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. यात गरोदर महिलांच्याही अत्यावश्यक तपासण्या करण्यात आल्या. अशा प्रकारचे शिबिरे कायम भरवले जातात त्यामुळे सर्वसामान्यांचे आरोग्य जपले जाते. रिपोर्टमध्ये त्रुटी जाणवल्यास औषध गोळ्यांनी बरे केले जाते असे वैद्यकीय अधिकारी तहुरा शेख यांनी सांगितले. हे शिबिर डॉ. तहुरा शेख, वैद्यकीय अधिकारी यांच्या मार्गदर्शनाखाली घेण्यात आले होते. हे शिबिर यशस्वीरित्या पार पडावे यासाठी सुप्रिया ओव्हळ, छाया तोटरे, छाया कुंभार, निखिल गायकवाड, रोहित अभंग, सचिन साळुंके याचप्रमाणे सर्व 'आशा'ताई यांचे सहकार्य लाभले.





## असुर्डे खापरेवाडी ग्रामस्थांचा राष्ट्रवादीत प्रवेश; शिवसेना (उबाठा) ला धक्का

**चिपळूण (दै. आरंभ पर्व)**

तालुक्यातील असुर्डे खापरेवाडी येथील ग्रामस्थांनी आमदार शेखर निकम यांच्या कार्यपद्धतीवर विश्वास व्यक्त करत राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात प्रवेश केला. या घडामोडीमुळे स्थानिक राजकारणात चर्चेला उधाण आले असून शिवसेना (उबाठा) पक्षाला धक्का बसल्याचे मानले जात आहे. आमदार शेखर निकम यांनी नवप्रवेशितांचे स्वागत करत ग्रामस्थांच्या समस्या सोडवण्यासाठी आणि विकासकामांना गती देण्यासाठी कटिबद्ध असल्याचे सांगितले. "लोकांच्या समस्या ऐकणे ही सुरुवात असते, पण त्या सोडवणे हीच खरी नेतृत्वाची ओळख," असे त्यांनी यावेळी नमूद केले. या प्रवेशावेळी सोमा खापरे, काशिनाथ खापरे, संतोष खापरे, अजित खापरे यांसह अनेक ग्रामस्थांनी उत्स्फूर्त सहभाग घेतला. कार्यक्रमास पुजा निकम, संजय कदम, दत्ताराम गुजर, राजेंद्र सुर्वे, पंकज साळवी यांच्यासह विविध पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते. ग्रामस्थांनी हा निर्णय विकासाच्या दृष्टीने महत्त्वाचा असल्याचे सांगत, आमदार निकम यांच्या नेतृत्वाखाली परिसराच्या प्रगतीला नवी दिशा मिळेल, असा विश्वास व्यक्त केला.

## भक्ती शक्ती योग परिवाराचा तृतीय वर्धापन दिन जल्लोषात संपन्न

**धायरी (दै. आरंभ पर्व)**

धायरी येथील भक्ती शक्ती योगसाधना वर्गाचा तृतीय वर्धापन दिन साधकांच्या उत्साही उपस्थितीत अतिशय सुंदर वातावरणात संपन्न झाला. 'स्वस्थ तन, आनंदी मन आणि निरामय जीवन' हा उद्देश डोळ्यासमोर ठेवून मागील तीन वर्षांपासून हा योग वर्ग दररोज पहाटे पाच वाजता मोफत सुरू असून परिसरातील अनेक महिला-पुरुष त्याचा लाभ घेत आहेत. वर्गात शास्त्रोक्त पद्धतीने विविध योगसाधना, व्यायाम तसेच आरोग्यविषयक मार्गदर्शन दिले जाते. कार्यक्रमात पुणे महानगरपालिका महिला व बालकल्याण अध्यक्ष अल्पना वरपे, नगरसेवक काका चव्हाण, नागसेविका अनिता इंगळे, अष्टांग आयुर्वेदिक महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. हेमलता जालगावकर, गणेश वरपे व हेमेंद्र जोशी हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. वर्गामध्ये विविध सण धार्मिक पद्धतीने साजरे करून संस्कृतीचा वारसा जपला जात असून वेटलॉस शिबिराच्या माध्यमातून अनेक साधकांचे वजन कमी करण्यात यश मिळत आहे. महिला दिनाचे औचित्य साधून सामाजिक क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या महिलांना 'नारीशक्ती सन्मान' पुरस्कार देऊन गौरविण्यात आले. कार्यक्रमामध्ये स्वाती कुमठेकर यांच्या दिग्दर्शनाखाली महिला साधकांनी 'विठ्ठल विठ्ठल' तसेच 'उदे ग अंबे उदे' या गीतांवर आकर्षक नृत्य सादर करून उपस्थितांची मने जिंकली. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी अनुराधा जाधव, अलका कटाप, अश्विनी सुतार, रेणुका टाके, भरत काळे, उर्मिला कात्रे, मनीषा कामठे, विद्या मते, भारती पाटील, शोभा खांदवे, क्षितिजा अभंग, करुणा गायकवाड, सुरेखा व्हनखंडे, संजीवनी मुरकर, सुगंधा वाघमारे, मालुताई पाटील, निकिता लोणारे, मंगल लोणारे, संदीप दारवटकर, संजीव पाटील, सचिन सोनवणे, प्रथमेश वैद्य व आकाश पिटले यांचे विशेष सहकार्य लाभले. 'नारीशक्ती हीच भक्ती शक्ती योग परिवाराची खरी ओळख आहे', असे सांगत महिला दिनाचे औचित्य साधून हा कार्यक्रम आयोजित करण्यात आल्याची माहिती डॉ. सचिन काटे यांनी दिली. तसेच परिसरातील नागरिकांनी सुदृढ आरोग्यासाठी या योग वर्गात सहभागी व्हावे, असे आवाहनही करण्यात आले.



**नारीशक्ती सन्मान पुरस्कार**

1. डॉ. अंजली गुर्जर – शिक्षण
2. डॉ. दिपाली मुळे – वैद्यकीय
3. मनीषा मराडे – जेलर
4. लौकिक पानसरे – नृत्य
5. डॉ. वीथिका टिकू – संगीत
6. जागृती कुलकर्णी – पत्रकारिता
7. डॉ. श्वेता विचारे – योग
8. पूजा पवार – समाज विकास
9. उमा राय – कौशल्य विकास

## ९१११ डोंबिवलीकरांनी रचला इतिहास, गिनीज वर्ल्ड रेकॉर्ड

**डोंबिवली (दै. आरंभ पर्व)**

जागतिक महिला दिनाच्या निमित्ताने डोंबिवलीसह कल्याण तालुक्यातील ९ हजार १११ महिला आणि विद्यार्थीनीनी एकत्र येत सामूहिक लेझीम वादनात एक जागतिक वर्ल्ड रेकॉर्ड करून डोंबिवलीच्या शिरपेचात एक मानाचा तुरा खोवला आहे. भाजप प्रदेशाध्यक्ष, आमदार रविंद्र चव्हाण यांच्या डोंबिवलीकर एक सांस्कृतिक परिवार आणि कल्याण तालुका शारीरिक शिक्षण समितीच्या संयुक्त विद्यमाने आयोजित सामूहिक लेझीम वादन स्पर्धेत रविवारी येथील श्री संत सावळाराम क्रीडा संकुल या क्रीडांगणामध्ये ठाणे जिल्ह्यातील शेकडो शाळांच्या विद्यार्थीनी आणि महिला भगिनी आदींनी एकत्र येत ९,१११ एवढ्या मोठ्या संख्येने सामूहिकपणे लेझीम वादनाचा वर्ल्ड रेकॉर्ड केला. या आधी सांगलीकरांच्या नावाने हा रेकॉर्ड होता, अशी माहिती गिनीज वर्ल्ड रेकॉर्डचे लंडनहून आलेले अधिकारी स्वप्नील डांगरेकर यांनी सांगितले. त्या ठिकाणी या आधी ७ हजार ३३८ महिलांनी एकत्र येऊन तो रेकॉर्ड रचला होता, मात्र तो रविवारी डोंबिवलीत मोडण्यात आल्याचे त्यांनी जाहीर केले. साडेपाच मिनिटांची विविध प्रात्यक्षिक सादर करून महिलांनी हा रेकॉर्ड केला. त्यावेळी स्वप्नील डांगरेकर यांनी आमदार रविंद्र चव्हाण यांच्या पत्नी सुहासिनी रविंद्र चव्हाण यांच्याकडे वर्ल्ड रेकॉर्ड झाल्याचे सर्टिफिकेट व मेडल हस्तांतरीत केले. त्यावेळी रविंद्र चव्हाण यांनी उपस्थितांचे आभार मानत लेझीम ही आपली संस्कृती असून ती टिकवणे हे आपले काम आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी यंदाच्या वर्षी शारीरिक व्यायामावर भर देऊन जगासमोर सशक्त भारत कसा असू शकतो हे दाखवून देण्याचा संकल्प सोडला होता, त्या निमित्ताने महिला आणि विद्यार्थीनी आदींनी एकत्र येऊन हा अनोखा रेकॉर्ड केला याचा मला डोंबिवलीकर म्हणून प्रचंड आनंद आहे.






## ड्रीमी टेक्नॉलॉजीचा भारतात विस्तार; 'L40 अल्ट्रा AE' आणि 'D20 अल्ट्रा' रोबोटिक व्हॅक्यूम लॉंच


**पुणे (दै. आरंभ पर्व)**

स्मार्ट होम इनोव्हेशनमधील जागतिक आघाडीची कंपनी 'ड्रीमी टेक्नॉलॉजी'ने आज भारतात आपल्या रोबोटिक व्हॅक्यूम पोर्टफोलिओमध्ये 'ड्रीमी L40 अल्ट्रा AE' आणि 'ड्रीमी D20 अल्ट्रा'या दोन नवीन उत्पादनांची भर टाकली आहे. आधुनिक घरांसाठी खास तयार केलेली ही उत्पादने हाय-पॉवर्ड सक्शन क्षमता, इंटेलिजेंट नेव्हिगेशन सिस्टम आणि प्रगत अडथळा टाळण्याच्या तंत्रज्ञानाचा एक उत्कृष्ट मिलाफ आहेत. याचा परिणाम म्हणजे एक अचूक आणि अत्यंत कार्यक्षम साफसफाईचा अनुभव मिळतो, ज्यामुळे तुमच्या घराचा कोपरा न कोपरा पूर्णपणे स्वच्छ होतो. भारतीय ग्राहक ज्याप्रमाणे स्मार्ट होम सोल्यूशन्सचा अवलंब करत आहेत, ते लक्षात घेऊन ड्रीमीने अधिक सोय, कार्यक्षमता आणि वैयक्तिक साफसफाईचा अनुभव देणारी नाविन्यपूर्ण उत्पादने आणली आहेत. ऑटोमेटेड मॉपिंग सिस्टम, स्मार्ट कार्पेट डिटेक्शन आणि स्वयंचलित साफसफाई व देखभालीची क्षमता असलेल्या 'मल्टीफंक्शनल डॉक्स'सह, ही नवीन उत्पादने कोणत्याही त्रासाशिवाय साफसफाईचा अनुभव देतात. या उपकरणांमध्ये ड्रीमीची वॉर्मॅक्स™ सक्शन सिस्टम आणि इंटेलिजेंट मॅपिंग यांसारखी प्रगत तंत्रज्ञाने समाकलित केलेली आहेत, जी दैनंदिन साफसफाई सुलभ करतानाच वेगवेगळ्या पृष्ठभागांवर उत्कृष्ट कामगिरी सुनिश्चित करतात. १८ मार्चपासून, L40 अल्ट्रा AE आणि D20 अल्ट्रा अनुक्रमे ५९,९९९ आणि ३९,९९९ रुपयांच्या किमतीत ॲमेझॉन इंडिया आणि निवडक क्रोमा स्टोअर्सवर उपलब्ध होतील. ड्रीमी टेक्नॉलॉजी इंडियाचे व्यवस्थापकीय संचालक मनू शर्मा म्हणाले की, "भारतीय ग्राहक दैनंदिन जीवन सोपे करणाऱ्या स्मार्ट आणि उच्च-कार्यक्षमता असलेल्या सोल्यूशन्सचा वाढत्या प्रमाणात स्वीकार करत आहेत. आम्ही पाहत असलेला सर्वात मोठा बदल म्हणजे




ऑल-इन-वन आणि उच्च स्वयंचलित साफसफाईच्या उपायांना मिळणारी पसंती, जे मानवी प्रयत्न कमी करून उत्कृष्ट कामगिरी देतात. L40 अल्ट्रा AE आणि D20 अल्ट्रा च्या लॉंचसह, आम्ही आमचा पोर्टफोलिओ इंटेलिजेंट आणि पूर्णपणे एकात्मिक प्रणालींसह विस्तारत आहोत जे प्रगत ऑटोमेशनसह शक्तिशाली साफसफाईचा मेळ साधतात. ही सोल्यूशन्स ग्राहकांना त्यांच्या घराचे व्यवस्थापन करण्यासाठी अधिक नियंत्रण आणि लवचिकता देतात, तसेच नाविन्यपूर्णतेद्वारे दैनंदिन जीवन अधिक सुसह्य करण्याचे आमचे ध्येय अधिक दृढ करतात." १९,०००Pa वॉर्मॅक्स™ सक्शन आणि प्रगत ब्रश सिस्टम: ड्रीमीचे पेटंट असलेले 'TurboForce' मोटर उद्योगातील मानकांपेक्षा कितीतरी पटीने अधिक सक्शन पॉवर (ओढण्याची शक्ती) प्रदान करते. ड्रीमी L40 अल्ट्रा AE मध्ये अंतर्गत रोटर इलेक्ट्रोमॅग्नेटिक डिझाइन आहे, जे मोटरचा जास्तीत जास्त फिरण्याचा वेग वाढवते आणि १९,०००Pa इतकी उच्च सक्शन पॉवर देते. आवाजाची गुणवत्ता सुधारण्यासाठी आणि कमी फ्रिक्वेन्सीचा आवाज कमी करण्यासाठी यातील 'टूथ-टू-स्लॉट' गुणोत्तर देखील ऑप्टिमाइझ करण्यात आले आहे. ट्रायकट ब्रश ३.०: हे तंत्रज्ञान वेगवेगळ्या प्रकारच्या फरशींनुसार साफसफाई करते आणि पाळीव प्राणी असलेल्या घरांसाठी अत्यंत उपयुक्त आहे. उपसता येण्याजोगा रबर ब्रश कडक फरशी आणि कार्पेटवरील धूळ व कचरा कार्यक्षमतेने काढून टाकतो. विशेषतः कार्पेट आणि फरशीच्या फटींमधील सुका कचरा अडकून न पडता साफ केला जातो. ट्रायकट ब्रश ३.० लांब केस आणि पाळीव प्राण्यांच्या केसांच्या स्वच्छतेसाठी डिझाइन केले आहे; यातील अंगभूत हेअर-कटिंग ब्लेड केसांमधील गुंता कापून ते सहजपणे गोळा करते. सखोल कोपऱ्यांची स्वच्छता: यातील अंगभूत 'मॉप-एक्सटेंड™ रोबो-स्विंग' तंत्रज्ञान आपल्या "रोबोट हाताचा" विस्तार करून अरुंद जागांपर्यंत पोहोचते. हे तंत्रज्ञान कोपऱ्यांमधील छोटे डाग, अन्नाचे तुकडे आणि सांडलेले कोल्ड ड्रिंक सहजपणे स्वच्छ करते. नवीन 'मॉप-एक्सटेंड™ रोबो-स्विंग' तंत्रज्ञान कडा आणि वेड्यावाकड्या कोपऱ्यांमधील कचरा सहज हाताळते. हा रोबोट कोपऱ्यांमध्ये खोलवर शिरतो आणि कमी उंचीच्या सोफ्याखाली दडलेला कचरा देखील साफ करतो. 3DAdapt™ स्मार्ट नेव्हिगेशन आणि अडथळा निवारण: हे तंत्रज्ञान घरातील फर्निचर आणि इतर वस्तू हुशारीने शोधते, ज्यामुळे कोणत्याही वस्तूला न धडकता सुरळीत साफसफाई होते. हँड्स-फ्री देखभालीसह 'बहुउद्देशीय पॉवरडॉक™': हे डॉक कचरा आपोआप रिकामा करणे, पाणी भरणे, मॉप सुकवणे आणि ७५°C गरम पाण्याने मॉपची स्वयंचलित साफसफाई करणे यांसारख्या वैशिष्ट्यांसह पूर्णपणे स्वयंचलित अनुभव देते, ज्यामुळे उत्तम स्वच्छता राखली जाते. स्वयं-स्वच्छ होणारे वॉशबोर्ड २.०: हे डॉक सिस्टमला आपोआप स्वच्छ करते, ज्यामुळे कचरा साचण्याचे प्रमाण कमी होते आणि देखभालीची गरज कमी भासते.

## थोडक्यात पण महत्वाचे




### सिंधू सेवा दलातर्फे शुक्रवारी (ता. २०) 'चेटीचंड' महोत्सव

पुणे (आरंभ पर्व) : सिंधी समाजाचे नूतन वर्ष व भगवान साई झुलेलाल यांच्या १०७६ व्या जन्मोत्सवानिमित्त सिंधू सेवा दलातर्फे 'चेटीचंड' महोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे. येत्या शुक्रवारी (दि. २० मार्च) हा महोत्सव डेक्कन कॉलेज बँक्वेट हॉल, डेक्कन कॉलेज ग्राउंड, बॉम्बे सॅपर्स जवळ, येरवडा, पुणे येथे होणार आहे, अशी माहिती सिंधू सेवा दलाचे अध्यक्ष सचिन तलरेजा यांनी पत्रकार परिषदेत दिली. प्रसंगी सिंधू सेवा दलाचे माजी अध्यक्ष सुरेश जेठवानी, अशोक वासवानी ॲड. हरेश हेमराजानी व विजय दासवानी, सचिव जय पिंजानी, सहसचिव किरण फेरवानी, खजिनदार राजेंद्र फेरवानी व जनसंपर्क अधिकारी देवेंद्र चावला आदी उपस्थित होते. सचिन तलरेजा म्हणाले, "चेटीचंड महोत्सवात सांस्कृतिक कार्यक्रम आणि सिंधी समाज बांधवांचा मेळावा होणार आहे. सायंकाळी ७ वाजता भगवान साई झुलेलाल यांच्या प्रतिमेचे पूजन व आरती करून सामाजिक आणि सांस्कृतिक महोत्सवाची सुरुवात होईल. यंदाचा चेटीचंड महोत्सव महिला सक्षमीकरणावर आधारित आहे. संपूर्ण महिलांचा कलाकारांच्या संचाकडून यंदा सादरीकरण होणार आहे. यामध्ये संगीतकार, गायक, वादक सर्वच कलाकार महिला असून, त्यांच्यातील क्षमता, कल्पकता आणि नेतृत्व पुणेकरांना अनुभवता येणार आहे.



### योगमाया प्रतिष्ठानच्या निबंध स्पर्धेचा पारितोषिक सोहळा उत्साहात

मुक्ताईनगर (आरंभ पर्व) : योगमाया प्रतिष्ठानतर्फे शिवजयंतीनिमित्त आयोजित भव्य निबंध लेखन स्पर्धेचा पारितोषिक वितरण सोहळा संत मुक्ताबाई महाविद्यालयात उत्साहात पार पडला. या कार्यक्रमास तहसीलदार गिरीश वखारे प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित होते. यावेळी बोलताना वखारे म्हणाले की, छत्रपती शिवाजी महाराजांचे कार्य आणि विचार आजही विद्यार्थ्यांसाठी प्रेरणादायी आहेत. विद्यार्थ्यांनी शिवरायांचा आदर्श समोर ठेवून प्रगती साधावी, असे त्यांनी आवाहन केले. कार्यक्रमाची सुरुवात शिवाजी महाराजांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून व दीपप्रज्वलनाने झाली. प्रतिष्ठानचे संस्थापक अध्यक्ष अश्विन सुरवाडे यांनी प्रास्ताविकात 'शिवविचारांचा करूया जागर' या संकल्पनेची माहिती दिली. या स्पर्धेत मुक्ताईनगर परिसरातील तब्बल ४०५ विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. विविध सहा गटांमधून निवडलेल्या ३५ विजेत्यांचा सन्मान मान्यवरांच्या हस्ते करण्यात आला. परी पाटील, कार्तिक कोळी, प्रियंका जाधव, समर्थ धनगर, दिव्यांशी पाटील, शर्वरी पाटील आणि सानिका सोनार यांनी आपापल्या गटात प्रथम क्रमांक मिळवला. कार्यक्रमास प्राचार्य डॉ. आय. डी. पाटील, प्रा. शेवाळे यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते. आभार प्रदर्शन प्रवीण राठोड यांनी केले. या कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी प्रतिष्ठानच्या पदाधिकाऱ्यांनी विशेष परिश्रम घेतले.

### गुढीपाडव्याच्या निमित्ताने सेन्कोचे खास दागिने आणि आकर्षक ऑफर्स




मुंबई (आरंभ पर्व) : गुढीपाडवा या मराठी नववर्षाच्या निमित्ताने सेन्को गोल्ड अँड डायमंड्सने पारंपरिक आणि आधुनिकतेचा संगम असलेला खास दागिन्यांचा संग्रह सादर केला आहे. नव्या सुरुवातीचे प्रतीक असलेल्या या सणासाठी ग्राहकांना आकर्षक ऑफर्सचीही घोषणा करण्यात आली आहे. या विशेष संग्रहात महाराष्ट्राच्या सांस्कृतिक परंपरेतून प्रेरित नथ, तुशी यांसारखे पारंपरिक दागिने आधुनिक डिझाइनसह सादर करण्यात आले आहेत. तसेच सोन्याचे हार, मंगळसूत्र प्रेरित डिझाइन, अँटिक फिनिश दागिने आणि आकर्षक कानातले यांचा देखील समावेश आहे. सणासुदीच्या निमित्ताने कंपनीकडून सोन्याच्या दरावर प्रति ग्रॅम ₹४०० पर्यंत सवलत, तसेच सोन्याच्या दागिन्यांच्या घडणावळीवर २०% पर्यंत सूट दिली जात आहे. हिऱ्यांच्या दागिन्यांवर घडणावळीच्या शुल्कावर ५०% आणि हिऱ्यांच्या किमतीवर १२% पर्यंत सवलत देण्यात येत आहे.

# समाविष्ट गावांतील कर आकारणीवर महापौरांची विशेष बैठक

## सभासदांची समिती स्थापन करण्याचा निर्णय



**पुणे (दै. आरंभ पर्व)**

पुणे महानगरपालिका हद्दीत नव्याने समाविष्ट झालेल्या गावांमधील कर आकारणीबाबत नागरिकांकडून येत असलेल्या तक्रारींच्या पार्श्वभूमीवर महापौर मंजुषा नागपुरे यांच्या अध्यक्षतेखाली विशेष बैठक घेण्यात आली. ही बैठक सोमवारी (१६ मार्च) दुपारी शिवाजीनगर येथील परिमंडळ क्र. २ कार्यालयात पार पडली.

बैठकीला गटनेते काका चव्हाण, सुभाष नाणेकर तसेच समाविष्ट गावांतील इतर लोकप्रतिनिधी उपस्थित होते. प्रशासनाकडून अतिरिक्त महापालिका आयुक्त पृथ्वीराज बी.पी. आणि उपआयुक्त (कर आकारणी) रवी पवार उपस्थित होते. याशिवाय समाविष्ट गावांतील नागरिक आणि प्रतिनिधी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

बैठकीच्या सुरुवातीला मिळकतकर विभागाने समाविष्ट गावांमधील कर आकारणीसंदर्भात सविस्तर सादरीकरण केले. त्यानंतर लोकप्रतिनिधी आणि नागरिकांनी विविध मुद्दे उपस्थित करत निवासी व बिगरनिवासी मिळकतींवर जास्त कर आकारणी होत असल्याची तक्रार मांडली. शेजारील गावांचा ए.आर. व्ही. विचारात न घेता कर आकारणी करण्यात आल्याचे तसेच ग्रामपंचायत पद्धतीप्रमाणे कर आकारणी करावी, अशी मागणीही करण्यात आली. नागरिकांनी पायाभूत सुविधा पूर्णपणे उपलब्ध नसताना महानगरपालिकेच्या प्रमाणे कर आकारणी करणे योग्य नसल्याचे मत व्यक्त केले. तसेच दंड, शास्ती आणि व्याजावर व्याज आकारणीबाबतही आक्षेप नोंदविण्यात आला. नांदेड सिटी परिसरातील मिळकतींना स्वतंत्र सुविधा असतानाही कोणतीही विशेष कर सवलत देण्यात आलेली नसल्याचा मुद्दाही यावेळी उपस्थित करण्यात आला.

यावर अतिरिक्त महापालिका आयुक्त पृथ्वीराज बी.पी. यांनी कर आकारणी ही धोरणात्मक बाब असून महानगरपालिकेच्या मुख्य सभेने मंजूर केलेल्या ठरावांनुसारच ती करण्यात येत असल्याचे स्पष्ट केले. या धोरणामध्ये बदल करण्यासाठी मुख्य सभेचा नवीन ठराव आवश्यक असल्याचे त्यांनी सांगितले.

बैठकीच्या अध्यक्षस्थानावरून बोलताना महापौर मंजुषा नागपुरे यांनी समाविष्ट गावांतील कर आकारणीच्या प्रश्नावर संबंधित सभासदांची एक समिती स्थापन करण्याचा निर्णय जाहीर केला. या समितीकडे सर्व संबंधितांनी आपली लेखी मते व सूचना सादर कराव्यात, त्यानंतर प्रशासनाशी चर्चा करून योग्य तो मार्ग काढण्यात येईल, असे त्यांनी सांगितले. आवश्यक असल्यास राज्य शासनाचे मार्गदर्शनही घेतले जाईल, असेही त्यांनी नमूद केले.

तसेच सन २०२६ च्या महापालिका अंदाजपत्रकात समाविष्ट गावांतील पायाभूत सुविधांसाठी अधिक तरतूद करण्याबाबत लेखी सूचना देण्याचे आवाहनही महापौरांनी केले. बैठकीच्या शेवटी गटनेते काका चव्हाण यांनी सर्व उपस्थितांच्या वतीने महापौरांचे आभार मानले.

## पुण्यात "राष्ट्रीय गौरव पुरस्कार सोहळा २०२६" उत्साहात

**पुणे (दै. आरंभ पर्व)**




### कर्तृत्ववान शेतकरी व समाजसेवकांचा सन्मान

आनंदी युनिव्हर्स फाउंडेशनतर्फे आयोजित "राष्ट्रीय गौरव पुरस्कार सोहळा 2026" पुण्यात उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला. कृषी क्षेत्र, समाजकार्य, ग्रामीण विकास आणि शेतीसंबंधित विविध क्षेत्रांमध्ये उल्लेखनीय कार्य करणाऱ्या व्यक्तींना यावेळी सन्मानित करण्यात आले.

या कार्यक्रमाला प्रमुख पाहुण्या म्हणून सिने अभिनेत्री नेहा पटिले आणि अपूर्वा परदेशी उपस्थित राहिल्या. त्यांच्या उपस्थितीमुळे सोहळ्याला विशेष आकर्षण प्राप्त झाले.

संस्थेचे अध्यक्ष गणेश रामदास विटकर यांच्या नेतृत्वाखाली हा कार्यक्रम यशस्वीरीत्या पार पडला. यावेळी स्वप्निल पवार (वन वे इंटरटेनमेंट), कृषी अधिकारी एस. एस. सावंत यांच्यासह अनेक उद्योजक, कृषी तज्ज्ञ आणि सामाजिक कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. महाराष्ट्रातील विविध जिल्ह्यांमधून सेंद्रिय शेती, शाश्वत शेती पद्धती, जलसंधारण, पशुपालन, महिलांचे सक्षमीकरण आणि कृषी उद्योजकता या क्षेत्रात उल्लेखनीय काम करणाऱ्या व्यक्तींना "राष्ट्रीय गौरव पुरस्कार 2026" प्रदान करून गौरविण्यात आले. यावेळी बोलताना अध्यक्ष गणेश विटकर म्हणाले, "महाराष्ट्रातील प्रत्येक शेतकरी हा आपल्या देशाचा खरा हिरो आहे. त्यांच्या अथक परिश्रमामुळे समाजाची प्रगती आणि अन्नसुरक्षा शक्य झाली आहे. शेतकऱ्यांचा सन्मान करणे हे आमचे कर्तव्य आणि अभिमान आहे." या कार्यक्रमादरम्यान शेतकऱ्यांसाठी मोफत मार्गदर्शन शिबिरे, कृषी उद्योजकतेसाठी प्रशिक्षण कार्यशाळा, विद्यार्थ्यांसाठी ॲग्री-इनोव्हेशन स्पर्धा तसेच राज्यभर "शेती प्रेरणा अभियान" राबवण्याची घोषणाही करण्यात आली. एकूणच हा सोहळा केवळ पुरस्कार वितरणापुरता मर्यादित न राहता कृषी क्षेत्राला नवी दिशा देणारा आणि शेतकऱ्यांच्या कर्तृत्वाचा गौरव करणारा प्रेरणादायी उपक्रम ठरला.

## विवो T5x 5G लॉन्च; दमदार बॅटरी आणि टर्बो परफॉर्मन्सची मेजवानी

**पुणे (दै. आरंभ पर्व)**




विवो इंडियाने T5 सिरीजमधील पहिला स्मार्टफोन विवो T5x 5G भारतात लॉन्च केला असून, मोठी बॅटरी आणि शक्तिशाली प्रोसेसरमुळे हा फोन सेगमेंटमध्ये वेगळा ठरत आहे. या स्मार्टफोनची सुरुवातीची किंमत ₹18,999 ठेवण्यात आली आहे.

या फोनमध्ये 7200 mAh क्षमतेची बॅटरी देण्यात आली असून, दीर्घकाळ वापरासाठी ती उपयुक्त ठरते. 44W फास्ट चार्जिंगमुळे फोन जलद चार्ज होतो, तसेच रिव्हर्स चार्जिंगची सुविधाही उपलब्ध आहे. परफॉर्मन्सच्या बाबतीत, मीडियाटेक डायमेन्सिटी 7400 टर्बो प्रोसेसरमुळे हा फोन वेगवान आणि स्मूथ अनुभव देतो. AnTuTu वर 1 मिलियनपेक्षा जास्त स्कोअर मिळाल्यामुळे हा फोन आपल्या श्रेणीत आघाडीवर असल्याचे सांगितले जात आहे.

कॅमेरा विभागात 50 मेगापिक्सलचा मुख्य कॅमेरा आणि 32 मेगापिक्सलचा फ्रंट कॅमेरा देण्यात आला आहे. तसेच IP68 आणि IP69+ वॉटर रेझिस्टन्स व मिलिटरी-ग्रेड टिकाऊपणा यामुळे हा फोन अधिक मजबूत बनतो. T5x 5G हा फोन सायबर ग्रीन आणि स्टार सिल्व्हर या दोन रंगांमध्ये उपलब्ध असून, 6GB, 8GB RAM आणि 256GB स्टोरेजपर्यंत पर्याय आहेत.

## बजाज जनरल इन्श्युरन्सचे व्यावसायिक वाहनांसाठी 'इको ॲश्युअर'

**पुणे (दै. आरंभ पर्व)**



भारतातील अग्रगण्य खाजगी जनरल इन्श्युरन्स कंपन्यांपैकी एक असलेल्या बजाज जनरल इन्शुरन्स लिमिटेड (पूर्वीची बजाज आलियान्झ जनरल इन्शुरन्स कंपनी लिमिटेड) कंपनीने आज व्यावसायिक वाहनांसाठी इको ॲश्युअर हे नवीन ॲड-ऑन कव्हर लाँच केल्याची घोषणा केली. हे नवीन कव्हर व्यावसायिक वाहन मालकांना दुरुस्तीचा खर्च अधिक कार्यक्षमतेने व्यवस्थापित करण्यास मदत करण्यासाठी तयार करण्यात आले आहे. तसेच, त्यांच्या वाहनांची कमीत कमी व्यत्ययासह सतत कार्यरत राहण्याची खात्री करण्यासाठीही हे उपयुक्त ठरेल. व्यावसायिक वाहने ही भारतभर मालवाहतूक, पुरवठा साखळी आणि व्यवसायिक गतिशीलता यांना समर्थन देण्यात महत्त्वाची भूमिका बजावतात. तथापि, दुरुस्तीचा वाढता खर्च, वाढते मेंटेनन्स अडचणी आणि व्यावसायिक वाहनांची असुरक्षितता यामुळे वाहनमालक आणि चालकांसाठी दुरुस्ती अनेकदा खर्चिक बाब ठरते. इको ॲश्युअर हे या अडचणींवर उपाय म्हणून विकसित करण्यात आले आहे. यामध्ये रिपेअरिंगचे अधिक व्यापक कव्हरेज, विश्वासार्ह दुरुस्ती पर्याय आणि अधिक संरक्षणात्मक फायदे प्रदान करण्यात आले आहेत ॲड-ऑन दोन पर्यायांमध्ये उपलब्ध आहे: इको ॲश्युअर इसेन्शल आणि इको ॲश्युअर ॲडव्हान्टेज हे कस्टमरला त्यांच्या गरजा पूर्ण करणारा प्लॅन निवडण्याची लवचिकता प्रदान करतात.

## एम. आर्च. करू इच्छिणाऱ्यांसाठी सेप्ट विद्यापीठात नवीन संधी

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

CEPT UNIVERSITY

नवीन शहरांची रचना करताना पर्यावरणीय आव्हानांचा सामना करण्यासाठी सेप्ट विद्यापीठातील आर्किटेक्चर शाखेत दोन विशेष पदव्युत्तर अभ्यासक्रम उपलब्ध झाले आहेत. मास्टर्स इन कन्झर्वेशन अँड रीजनरेशन (एमसीआर) आणि मास्टर्स इन लँडस्केप आर्किटेक्चर (एमएलए) अशी या अभ्यासक्रमांची नावे असून त्यामुळे आर्किकेक्ट्ससाठी संधी वाढणार आहेत. या अभ्याभ्यासक्रमांसाठी अर्ज करण्याची अंतिम तारीख ३१ मार्च २०२६ आहे. विद्यापीठाने दिलेल्या माहितीनुसार, मास्टर्स इन कन्झर्वेशन अँड रीजनरेशन या अभ्यासक्रमात संवर्धन या विषयाला प्रामुख्याने एक मूलगामी डिझाईनची पर्यावरणीय कृती मानण्यात आले आहे. त्यामुळे आजूबाजूच्या विकासविषयक दबावांना एकीकृत करू शकतील अशा ऐतिहासिक संरचनांचे सर्जनशील आणि जबाबदार पुनर्मांडणी करता येईल. इतिहास, तंत्रज्ञान, स्थापत्य आणि शहरी डिझाईन यांच्या संयोगामध्ये ज्यांना रस आहे, अशा विद्यार्थ्यांसाठी या अभ्यासक्रमाची रचना करण्यात आली आहे. मास्टर्स इन लँडस्केप आर्किटेक्चर (एमएलए) हा अभ्यासक्रम हवामान बदल आणि पर्यावरणीय परिवर्तनाला प्रतिसाद देणारा आहे.लँडस्केप आर्किटेक्चरमधील एम.आर्च हा अभ्यासक्रम व्यावसायिकांना लँडस्केप, पर्यावरणशास्त्र आणि समाज यांच्या संयोगावर काम करण्यासाठी तयार करणारा आहे. हा अभ्यासक्रम बागकामाच्या पलीकडे जाऊन भारतातील वाढत्या पर्यावरणीय, सामाजिक आणि शहरी आव्हानांना संबोधित करतो. तो लँडस्केपकडे एक गतिमान प्रणाली या दृष्टीने पाहून प्रादेशिक पाणलोट क्षेत्रांपासून ते शहरी सार्वजनिक जागांपर्यंत सर्व पातळींवर डिझाईन करण्याचे प्रशिक्षण विद्यार्थ्यांना देतो. यातील पदवीधर व्यवसाय, शिक्षण आणि संशोधन क्षेत्रात काम करणाऱ्या ५०० पेक्षा अधिक व्यावसायिकांच्या माजी विद्यार्थ्यांच्या जागतिक नेटवर्कमध्ये सहभागी होतील. या अभ्यासक्रमांमध्ये वास्तुकला शिक्षणाचे विकसित स्वरूप आणि भारताच्या बांधणी व नैसर्गिक वातावरणाला आकार देण्यासाठी आंतरविद्याशाखीय तज्ञांची वाढती गरज याचे एकत्रितपणे प्रतिबिंब पडले आहे. सेप्ट विद्यापीठात मध्ये पदव्युत्तर शिक्षण हा केवळ पदवीपूर्व कार्यक्रमाचा विस्तार नसतो. ते जाणीवपूर्वक विशेषीकरणाचे एक स्थान असते. इथे स्टुडिओ हे प्रयोगशाळा म्हणून, वास्तविक जगातील आव्हानांच्या सर्जनशील अन्वेषणासाठी एक जागा म्हणून काम करतात. इथे लहान गट तज्ज्ञ शिक्षकांसोबत युक्तिवाद विकसित करण्यासाठी, प्रोटोटाइपची चाचणी घेण्यासाठी आणि सातत्याने समीक्षा करून भूमिका अधिक सुधारण्यासाठी काम करतात. सेमिस्टर आणि उन्हाळी व हिवाळी स्कूलमध्ये पसरलेले हे अभ्यासक्रम व्यापक बांधणी वातावरणाच्या क्षेत्रातील विस्तृत शोधाची श्रेणी उघडते. विद्यार्थ्यांना कार्यशाळा, सॉफ्टवेअर, ग्रंथालय, अभिलेखागार, साहित्य प्रयोगशाळा आणि राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय व्यावसायिकांचे विस्तृत नेटवर्क या स्वरूपातील विस्तृत संसाधने उपलब्ध होतात.

# गुढीपाडव्याच्या रंगीबेरंगी गाठ्यांनी सजली बाजारपेठ

**राजगुरुनगर-किरण खुडे (दै. आरंभ पर्व)**



लाल, पिवळा, नारंगी अन् पांढऱ्या रंगांच्या साखरेच्या गाठींच्या खरेदीसाठी झालेली गर्दी, विविध आकारातील गाठींनी सजलेली दुकाने हे उत्साही चित्र सध्या राजगुरूनगर शहराच्या बाजारपेठेत दिसत आहे. गुढीपाडव्याच्या आनंदी सण एक दिवसावर येऊन ठेपल्याने साखरेच्या गाठींच्या खरेदीसाठी शहरातील जुना मोटार स्टॅन्ड, बाजारपेठ येथे लगबग पाहायला मिळत आहे. वैविध्यपूर्ण रंगांतील गाठींसह सुकामेवा (ड्रायफ्रूट) असलेल्या साखरगाठी हे या वर्षीचे वैशिष्ट्य आहे. असे तीन पिढ्यांपासून परंपरागत या व्यवसायात असणाऱ्या देवकर परिवारातील प्रतिक प्रमोद देवकर यांनी सांगितले. गुढीपाडव्याचा सण गुरुवारी (दि. १९) आनंदात साजरा केला जाणार आहे. या दिवशी घरासमोर गुढ्यांना बांधल्या जाणाऱ्या साखरेच्या गाठीला मागणी असते. विविध रंगांतील गाठी सध्या विक्रीसाठी उपलब्ध आहेत. लाल, गुलाबी, पिवळा, नारंगी, गुलाबी रंग लक्ष वेधून घेत आहे. एक गाठी वीस रुपयांपासून शंभर रुपयांपर्यंत मिळत आहे. सध्या साखरेच्या गाठी बनविण्याच्या कारखान्यात लगबग अंतिम टप्प्यात आली आहे. त्यामुळेच सणाचा गोडवा वाढविण्यासाठी गाठींच्या खरेदीसाठी बाजारपेठांमध्ये गर्दी होत आहे. कारखान्यांमध्ये तयार करून या गाठी होलसेल भावात दुकानांमधून विकल्या जात आहेत. व्यावसायिक प्रतिक देवकर म्हणाले, आम्ही दरवर्षी महाशिवरात्रीच्या दुसऱ्या दिवसापासून कारखान्यात साखरगाठी बनविण्यास सुरुवात करतो. अनेक वर्षांपासून रोज १०० किलोच्या साखरगाठी तयार करून त्याची होलसेल भावात विक्री करीत आहोत. छोट्या आकारातील गाठींची किंमत २० रुपयांपासून आहे, तर मोठ्या आकारातील गाठी १०० रुपयांपासून पुढे आहे. मध्यपूर्वेतील युद्धजन्य परिस्थितीमुळे व्यावसाईक गॅस सिलिंडर मिळणार नाही असे समजल्याने नाईलाजास्तव डीझेल भट्टी व जळाऊ लाकडांचा वापर करून भट्टी तयार तयार करावी लागली. यामध्ये अनंत अडचणींचा सामना करावा लागला. तसेच इतर कच्च्या मालाचे व मजूरीचे दर वाढले त्यामुळे नाईलाजास्तव गाठींच्या किमती २५ टक्के वाढवाव्या लागल्या आहेत.

## राजगुरू महाविद्यालयात वाणिज्य महोत्सव उत्साहात

**राजगुरूनगर-किरण खुडे (दै. आरंभ पर्व)**




राजगुरूनगर येथील खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाच्या हुतात्मा राजगुरू महाविद्यालयात वाणिज्य विभागांतर्गत कॉर्पोरेट या संकल्पनेवर आधारित वाणिज्य महोत्सव उत्साहात संपन्न झाला. यामध्ये बिजनेस गेम्स, सांस्कृतिक कार्यक्रम, रांगोळी स्पर्धा, रेखाचित्र स्पर्धा, ॲड-मॅड-शो, पोस्टर स्पर्धा फॅशन शो अशा विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात आले.

या महोत्सवाचे उद्घाटन युवा उद्योजक आणि मोनार्च ग्रुप ऑफ हॉटेल्सचे प्रमुख सीएस राहुल टाकळकर यांच्या हस्ते झाले. या प्रसंगी संस्थाध्यक्ष ॲड. देवेंद्र बुट्टेपाटील, उपाध्यक्ष नानासाहेब टाकळकर, संचालक बाळासाहेब लिंभोरे, प्राचार्य डॉ. शिरीष पिंगळे, डॉ. शिल्पा जगताप, प्रा. प्रियंका बालघरे, डॉ. गणेश धुमाळ उपस्थित होते. उद्घाटन प्रसंगी बोलताना उद्योजक राहुल टाकळकर यांनी उद्योजक होण्यासाठी कठोर परिश्रम, जिद्द व नियमित अभ्यासाचे महत्त्व अधोरेखित केले. आपला जीवनप्रवास सांगताना त्यांनी विद्यार्थ्यांनी केवळ नोकरीच्या मागे न लागता नाविन्यता, कल्पकता, धाडस दाखवून उद्योजकतेत उतरण्याचे आवाहन केले. संस्थाध्यक्ष ॲड. देवेंद्र बुट्टे पाटील यांनी वाणिज्य शाखेचे मार्केटमधील महत्त्व, रोजगाराच्या संधीबाबत विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. चाकण एमआयडीसी आणि कृषी क्षेत्राच्या माध्यमातून विद्यार्थ्यांनी उद्योगाच्या आणि रोजगाराच्या संधी शोधाव्यात असे आवाहन केले. वाणिज्य महोत्सवातील विविध उपक्रमांत प्रथम क्रमांक प्राप्त छकुली केदारी, हर्षदा पवार, श्रावणी जैद, हर्षल गेडाम, प्राजक्त आवारी, प्रतीक्षा आवारी, विलास सरडे, सिद्धी भदाणे, ओंकार सांडभोर, श्रीमंत हातागळे या विद्यार्थ्यांचा सन्मानचिन्ह देऊन विशेष गौरव करण्यात आला. या तीन दिवसीय वाणिज्य महोत्सवाचे आयोजन वाणिज्य विभाग प्रमुख डॉ. गणेश धुमाळ यांच्यासह डॉ. रूपाली कातोरे, प्रा. हेमलता चौधरी, प्रा. राजश्री सावंत, डॉ. तृप्ती दळवी, प्रा. जयश्री गोगावले, प्रा. ओंकार टाकळकर यांनी केले.

दैनिक आरंभ पर्व हे मालक, मुद्रक, प्रकाशक सुरेखा देवेंद्र मते यांनी श्रीराम आर्ट्स अँड प्रिंटिंग प्रेस मिळकत नं. 496, भाजी मंडई समोर, सिंहगड रोड, खडकवासला, हवेली, पुणे-411024 येथे छापून भाजी मंडल समोर, सिंहगड रोड, पुणे 411024 येथे प्रकाशित केले.
संपादक : सुरेखा देवेंद्र मते (पी.आर.बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी.) मा. श्री. लक्ष्मण साबळे (निवासी संपादक) प्रसिद्ध झालेल्या वृत्त व लेखांशी संपादक सहमत असतीलच असे नाही, न्यायालयीन क्षेत्र पुणे बंधनकारक : Email : aparvinfo@gmail.com

• ARAMBHA PARVA is a daily Newspaper, Printed, Published and Owned by Surekha Devendra Mate • Printed at Shreeram Arts and Printing Press Milkat No. 496, Bhaji Mandai Samor, Sinhagad Road, Khadakwasala, Haveli, Pune-411024 and Published at Opp. Baji Mandal, Sinhgad Road, Pune -411024. • Mobile No-7276314142 • Editor -Surekha Devendra Mate, (responsible for editorial content as per PRB Act) • E-mail-aparvinfo@gmail.com • Newspaper Legal Cases Will Be Settled in Pune Court.